





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १७.०६.२०२५ | अंक नं. ६६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













# महानगरपालिकेच्या नियोजनशून्य कामामुळे शहरासह उपनगरातील नागरिकही झाले त्रस्त

### सव्वातीन महिन्यानंतरही रस्त्याची दुर्दशा कायम

नगर - रस्त्याचे कॉंक्रीटीकरण तसेच पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी सिमेंट पाईप गटारीच्या कामासाठी शहराच्या मध्यवर्ती भागातील बहुतांश रस्ते खोदाई करून ठेवत शहराच्या निम्म्यापेक्षा

*(मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

### सर्व काम सुरु आहे ठेकेदार भरोसे


मनपाचे अधिकारी, कर्मचारी येतात, फक्त फोटोसेशन करतात व निघून जातात. बाकी सर्व काम ठेकेदार आणि त्याचे कर्मचारी यांच्या भरवशा सोडून दिलेले आहे. ठेकेदारावर कोणाचा अंकुश नसल्याने ठेकेदारही त्याच्या मनाला वाटेल तेव्हा आणि वाटेल तसे काम करत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला सिमेंट पाईप टाकलेत पण अजून चेंबर बांधलेले नाहीत, त्यामुळे हे पाईप खडी आणि गाळाने आत्ताच निम्मे भरले आहेत. त्यातून पावसाचे पाणी कसे वाहून जाणार? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

### नागरिकांनी कर रुपाने भरलेल्या पैशांचा अपव्यय

याशिवाय रस्त्याच्या दोन्ही बाजूने सिमेंट पाईप टाकल्यावर त्यावर खडी टाकण्यात आली. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी दोन्ही बाजूने पाईप टाकले पण ड्रेनेज लाईनचे काय? आणि मग खडी टाकलेला रस्ता पुन्हा एकदा खोदण्यात आला आहे. आता या ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन करण्यात येत आहे. ही खोदाई करताना यापूर्वीच्या नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या ज्या लाईन होत्या त्याची मोठ्या प्रमाणावर फुटतुट झाली आहे. या नियोजनशून्य कारभारामुळे कर रुपाने भरलेल्या पैशांचा अपव्यय होत असल्याचे या परिसरातील रहिवासी आणि माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी मनसुख वाबळे यांनी सांगितले आहे.

### फोटोसेशनऐवजी कामे करून घ्यावीत

याशिवाय या रस्त्यावरील दुकाने बंद आहेत. नागरिकांना घरी पायी जाणे किंवा घराबाहेर पडणेही मुश्कील झाले. मनपाच्या अधिकाऱ्यांनी फक्त फोटोसेशन करण्यासाठी न येता ठेकेदाराकडून जलदगतीने कामे करून घ्यावीत. ते काय काम करतात याकडे लक्ष ठेवावे व योग्य नियोजन करून नागरिकांना, व्यावसायिकांना गेल्या सव्वा तीन महिन्यांपासून होत असलेल्या त्रासातून दिलासा द्यावा.


दर्जेदार व माफक दरात **फ्लेक्स प्रिंटींग** संपर्क : 9403232323



## स्मृतीगंध



**स्व. शांतीलालजी नेमिचंदजी मुनोत**

स्व. दि. १७/६/२०१०

सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा
आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा
आजही दरवळत आहे...

*आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली !*

• शोकाकुल •

**केशरगुलाब मुनोत परिवार (नेवासकर)**
**मुनोत ग्रुप ऑफ कंपनीज्**
अहिल्यानगर




शुध्द, निखळ मनाने, सर्वांचा विश्वास जपत
शुन्यातुन विश्व निर्माण करणारे..
कोठारी परिवाराचा

## आधारस्तंभ



**स्व.श्री. रसिकलालजी चंदुलालजी कोठारी**

(जन्म : २३ ऑगस्ट १९५३ - मृत्यु : १८ जून २०२३)

आपले विचार, शिकवण आणि
आपण उभ्या केलेल्या व्यवसायरूपी
वटवृक्षाच्या सावलीत काम करतांना
आजही आपण आमच्यात आहात
अशी जाणीव होत आहे.

॥ आपल्या व्दितीय स्मृतिदिनी भावपूर्ण श्रध्दांजली ॥

*समस्त कोठारी परिवार*

शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका -ज्वेलर्स-
- सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी -

अहिल्यानगर । श्रीरामपुर । कडा



# गृहिणी

## आरोग्य

### लवकर निजे त्यास...

तुम्ही इंग्रजीत एक म्हण ऐकली असेलच Early to bed, early to rise, makes a man healthy, wealthy and wise. याचा अर्थ असा की रात्री लवकर झोपणे आणि सकाळी लवकर उठणे ही व्यक्ती निरोगी, श्रीमंत आणि बुद्धीमान बनवते. सकाळी लवकर उठणे ही एक चांगली सवय आहे. यामुळे तुमचा दिवस लवकर सुरू होण्यास मदत होते आणि तुमचे सर्व काम वेळेवर होते. जे लोक सकाळी लवकर उठून व्यायाम करतात त्यांना हृदयरोग होण्याची शक्यता कमी असते कारण लवकर उठून व्यायाम केल्याने आपल्या शरीरातील रक्ताभिसरण सुधारते. ज्यामुळे तुमचे हृदय निरोगी राहते आणि सुरळीत काम करत राहते. सकाळी लवकर उठल्याने तुम्हाला व्यायाम करण्यासाठी आणि निरोगी नाश्ता करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. नियमित व्यायाम आणि निरोगी अन्न वजन कमी करण्यासाठी प्रभावी आहे. सकाळी लवकर उठल्याने पचनसंस्था देखील चांगली राहते.

## पाककला

### रवेदार हलवा

**साहित्य :** १ किलो गाजर, १ वाटी खोबरे किस, १ पाव दूध, २ वाटी साखर, विलायची पावडर, ड्राय फ्रूट काप,

**कृती :** गाजराचे साले काढून घेऊन त्याचा किस करावा. कढई गरम करून त्यात सर्व साहित्य किस, दूध, खोबरे, साखर घालून परतून घ्या. आणि चांगले शिजवू द्यावे. सतत पलटवत राहिले की आधी मिश्रण पातळ होऊन नंतर घट्ट होत जाते. रंग बदलू न घट्ट पण आला की हलवा झाला समजावा.

## वास्तू

### येथे ठेवा चांदीचा मोर

❊ चांदीचा मोर पूजा घरात ठेवल्याने घरात सकारात्मकता कायम राहून भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मीची कृपा सदैव तुमच्यावर राहते. देवघरात चांदीचा मोर ठेवल्याने घरात सुख-समृद्धी राहून मानसिक शांती समाधान मिळते.

❊ जर तुमच्या घरात पैशांची समस्या वारंवार येत असेल किंवा पैसे येतील असे वाटते पण येत नाहीत. तर घरात एक छोटासा चांदीचा मोर ठेवणे गरजेचे आहे. चांदीच्या मोराला तिजोरी किंवा जिथे पैसे ठेवता त्या कपाटात चांदीचा मोर ठेवावा. यामुळे धनलाभ तर होतोच तसेच थांबलेले पैसेही मिळतात.

## सल्ला

❊ कडधान्य पदार्थांमध्ये वर्तमानपत्रांचे तुकडे घालून ठेवावेत. यामुळे वर्तमानपत्रावर असलेल्या शाईमुळे किटक कडधान्या भोवती येणार नाहीत.

❊ अद्रक लसूण पेस्ट तयार केल्यावर त्यात एक चमचा तेल टाकून मिक्स करावे आणि फ्रीजमध्ये ठेवावे. यामुळे पेस्ट खूप दिवस टिकते.

## सौंदर्य

अंड्याचा पांढरा भाग चेहऱ्यावर आणि काळ्या डागावर लावावा. १५ मिनिटांनी कोमट पाण्याने चेहरा धुतल्यानंतर चेहऱ्याची त्वचा क्लीन होऊन काळे डाग कमी होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १८ जून २०२५

**कालाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, पू.भा.२४।२३, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी आजचा दिवस आव्हानांनी भरलेला असणार आहे. तुम्हाला तुमच्या रागावर नियंत्रण ठेवावे लागेल.

**वृषभ :** आर्थिक परिस्थितीबद्दल काळजी वाटत असेल, तर आज ती दूर होईल कारण व्यवसायात अडकलेले पैसे तुम्हाला परत मिळाल्याने आनंद होईल.

**मिथुन :** उधारी वसूल होईल. आज काही समस्यांबद्दल तुम्हाला अनावश्यक काळजी वाटेल मात्र त्या निरुपयोगी असतील.

**कर्क :** कौटुंबिक जीवन जगणाऱ्या लोकांना एखाद्या गोष्टीची आज काळजी वाटेल. आवडीनुसार काम मिळाल्याने व्हाल. आज उत्पन्नात वाढ होईल.

**सिंह :** प्रेमीजनांना काही कामामुळे त्यांच्या जोडीदारापासून दूर जावे लागू शकते. वाहन वापरताना काळजी घ्यावी लागेल अन्यथा अपघाताचा धोका आहे. खर्चात वाढ झाल्यामुळे तुम्ही थोडे चिंतेत असाल.

**कन्या :** कोण काय म्हणते यावर आधारित तुम्ही काहीही करू नये. अन्यथा काम बिघडू शकते. योजनेत गुंतवणूक करण्याबद्दल विचार करावा लागेल. अन्यथा नुकसान होईल.

**तूळ :** तुमच्या घरात एखादा शुभ कार्यक्रम होत असल्याने आज वातावरण आल्हाददायक असेल. तुमच्या एखाद्या मित्राशी तुमचा वाद होऊ शकतो.

**वृश्चिक :** तुमच्या गरजा तसेच इतरांच्या गरजांची पूर्ण काळजी घेतली पाहिजे अन्यथा जवळची व्यक्ती तुमच्यावर रागावू शकते.

**धनु :** यवसाय करणाऱ्या लोकांना थोडा संघर्ष करावा लागेल मात्र त्यानंतर ते यश मिळवू शकतील. अपेक्षित नफा होईल.

**मकर :** व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. त्यांना त्यांच्या व्यवसायात अपेक्षित नफा मिळाल्याने आनंद होईल आणि ते उदारतेने गुंतवणूक देखील करतील.


**कुंभ :** जर तुम्हाला तुमच्या कौटुंबिक जीवनात काही समस्या येत असतील तर तुम्हाला त्यातून आराम मिळेल. तुम्ही तुमच्या कामात काही बदल करू शकता.

**मीन :** बेकायदेशीर योजनांमध्ये पैसे गुंतवल्याने तोटा होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी त्रासदायक असणार आहे. जोडीदारास कोणतेही वचन देवू नका. अन्यथा नुकसान होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२०१

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अनिर्बंध; मुक्त; बाधित न झालेले ४) साखर वगैरेचा कढविलेला रस; शुद्ध; रांधा ६) आशीर्वाद; नवरामुलगा ७) पृथ्वीच्या भोवतालचे हवेचे आवरण १०) कमतरता; उणीव; कसर; वानवा १२) कपट कारस्थान; कावा १३) एक मराठी आडनाव १४) तूर वगैरेच्या डाळीचे शिजवून केलेले पातळ कालवण १६) स्वच्छ; साफसूफ; चकपक १८) मुलगा; पुत्र २०) एक विषारी साप २२) आघात; घाव; जखम २३) काम करू नये अशी मानसिक व शारीरिक स्थिती; सुस्ती २५) छंद; आवाज; ध्वनी २६) कुलकर्णी; पूर्वीचे तलाठी

**उभे शब्द :-** १) अवकळा ; दुर्दशा; कर्कशा स्त्री २) सामान ज्यात बांधतात ते कापड अथवा गोणपाट ३) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते पात्र ४) पलीकडे; झाडाखालचा ओटा ५) अंग मोडून येणे ८) दही घुसळून त्यातून लोणी काढल्यानंतर राहिलेला द्रव ९) एकसारखे बोलणे; बडबड ११) सुवर्ण; कांचन; कनक; सोने १५) कागदाचा चतुर्थांश स्तंभ १७) दिसण्यात वेडसर; गबाळा; बावळट १८) ताजा; प्रफुल्लित; टवटवीत १९) सोंगटी; सारिका २१) संरक्षणासाठी केला जाणारा रात्रीचा फिरता पहारा २३) पंचमहाभूतांपैकी एक; पाणी २४) एक अधिक पाव

### शब्दगंध क्र. ७२०० चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपण केलेल्या त्यागाबद्दल लोकांनी आपल्याला सहानुभूती दाखवावी असे ज्याला वाटते तो खरा ढोंगी समजावा.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## ए.सी. रूममध्ये पाण्याची बादली का ठेवली जाते?

एसी रूममध्ये एसी लावला की थंडावा येतोच. पण, अनेकदा असेही होते की, एसी लावून देखील रुम थंड होत नाही. अशा वेळी नेमकं काय करावं, हे कळत नाही. यावर काही लोक एसी रूममध्ये पाण्याची बादली ठेवतात. पण, एसी रूममध्ये पाण्याची बादली का ठेवली जाते? फायदे काय? याविषयीची तुम्हाला माहिती आहे का? नसेल माहिती तर चिंता करू नका. याविषयी पुढे विस्ताराने जाणून घ्या. अनेक ठिकाणी तापमान इतके वाढले आहे की, एसी लावून देखील थंडावा मिळत नाही. अशा वेळी वेगवेगळ्या प्रकारच्या ट्रिक वापरून रूममध्ये थंडावा कसा राहिल, याचा विचार लोक करतात.

एसी रूममध्ये पाण्याने भरलेले भांडे ठेवतात किंवा पाण्याने भरलेली बादली ठेवतात असे आपण अनेकांना पाहिले असेल. एसी रूममधील हवा खूप कोरडी होते, ज्यामुळे त्वचा आणि घशात कोरडेपणा जाणवतो. एक बादली पाणी ठेवल्याने खोलीत ओलावा टिकून राहतो आणि ही समस्या कमी होते. खोलीतील आर्द्रता योग्य प्रमाणात असेल तर झोप चांगली येते. कोरड्या हवेत झोपल्याने झोपेत व्यत्यय येऊ शकतो, परंतु एक बादली पाणी ठेवल्यास ही समस्या दूर होऊ शकते.

कोरड्या हवेमुळे त्वचा कोरडी आणि निर्जीव होऊ शकते.

एक बादली पाणी ठेवल्याने खोलीत ओलावा राहतो, ज्यामुळे त्वचा हायड्रेट राहते. कोरड्या हवेमुळे घसा खवखवणे आणि सर्दी होऊ शकते. एक बादली पाणी ठेवल्याने खोलीत ओलावा टिकून राहतो आणि या समस्यांपासून बचाव होतो.

जर तुमच्या खोलीत झाडे असतील त्यांना ओलावा मिळतो आणि ते निरोगी राहतात. त्यामुळे पुढच्या वेळी एसी रूममध्ये आराम करताना पाण्याची बादली ठेवायला विसरू नका. यामुळे तुम्हाला थंडावा तर मिळेलच, शिवाय आरोग्यासाठीही अनेक फायदे होतील.

## कलकी अवतार

द्वापार युगात भगवंतांनी वसुदेव-देवकीच्या पोटी श्रीकृष्णावतार व नंतर सावित्री आणि वसुतर यांच्या पोटी बौद्धावतार घेतला. हा अवतार गुप्त असून, गयासुर इ. राक्षसांचा गुप्तपणे वध या अवतारात झाला आहे. यापुढे कलियुगात त्रिवेणीसंगमावर भगवान कलंकी अवतार घेतील, त्याची कथा ही अशी -

पूर्वी जाबाली नावाचा महान तपस्वी ऋषी होऊन गेला. ब्रह्मदेवांच्या वरामुळे त्याला दोन पुत्र व एक कन्या झाली. एकदा अचानक त्याची तब्येत अत्यवस्थ होऊन आपला मरणकाळ जवळ आला, असे त्याला वाटू लागले. जवळ असलेल्या कन्येस त्याने सांगितले, की माझ्या मृत्यूनंतर लगेच माझ्या हातातील मौल्यवान अंगठी काढून घे व तुझे भाऊ वनातून परत आल्यावर ताबडतोब त्यांना दे. जाबालीच्या कन्येने पित्याच्या मृत्यूनंतर अंगठी काढली, पण भावांना दिली नाही. शोकमग्न अवस्थेत दोघा भावांनी प्रेत स्मशानात नेल्यावर त्यांना पित्याच्या बोटातील अंगठीची आठवण झाली. त्यांनी बहिणीला विचारले असता, तिने कानावर हात ठेवले. बहीण खोटे बोलत आहे, हे ओळखून भावांनी तिला 'तू नीच कुळात जन्म घेशील' असा शाप दिला.

तिने पश्चात्ताप पावून उःशाप मागितला असता, तुझे लग्न उच्च कुळातील पुरुषाशी होऊन, कलियुग संपता संपता भगवान तुझ्या पोटी कलंकी अवतार घेतील व तुझा उद्धार होईल, असे सांगितले. याने समाधान न होऊन बहिणीनेही भावांना शाप दिला, की तुम्ही पक्षियोनीत जन्माला याल व त्यावेळी तुम्ही एकमेकांचे वैरी असाल. या शापांप्रमाणे जाबालपुत्र कावळा व पिंगळा या पक्षियोनीत जन्माला आले. त्यांचे प्रेम नाहीसे होऊन हाडवैर निर्माण झाले. कावळा झालेला मुलगा पुढे मानव योनीत दैत्यगुरु शुक्राचार्य झाले तर पिंगळा झालेला पुत्र देवगुरु बृहस्पती झाले. बृहस्पतीना त्रिकाल ज्ञान व शुक्राचार्यांना संजीवनी विद्या प्राप्त झाली, तरी त्यांचे वैर तसेच राहिले.

हा सर्व वृत्तांत जनमेजयाला कथन करुन पुढे वैशंपायन ऋषी म्हणाले, कलियुग हे अत्यंत तापदायक युग असून, माणसे अधर्माने वागतील. पापांचा अतिरेक झाल्यावर भगवंताला कलंकी अवतार घ्यावा लागेल. ते दुष्टांचा संहार करतील, नंतर पुन्हा सत्ययुगाला प्रारंभ होईल व पृथ्वीवर सुखसमृद्धी येईल.

# जीवन का अमृत (भाग १)



इसलिए धर्म, हमारी आत्मा और प्रभु के बीच की वस्तु है और बाकी सब प्रकार के पूजा-पाठ और धार्मिक रीति-रिवाज तब तक व्यर्थ हैं, जब तक हमारे दिल में दिव्य प्रेम जाग्रत नहीं होता। हम अपने हृदय में ही प्रेम और सच्चाई की ज्योति को सदा जलाकर रख सकते हैं।

जब से यह संसार बना है, तब ही से लगातार बुरी और अच्छी ताकतों के बीच झगड़ा चलता आया है। हमें प्रभु के रास्ते पर डाल दिया गया है, क्योंकि हमने प्रभु से प्रेम किया।

इनाम की इच्छा के करना चाहिए। ये स्वेच्छा से होने चाहिएँ। आप अपना भाग्य खुद बना सकते हैं। थोड़े से शब्दों में, अपने कर्तव्यों को निस्वार्थ भाव से निभाना, कर्म के रास्ते पर सफलता की कुंजी है।

मुझे यह जानकर खुशी हुई कि सत्गुरु की

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

दया से, आपके प्यारे बच्चों में, प्रेम और विवेक का विकास हो रहा है। दयालु सत्गुरु नामलेवाओं के रक्त-संबंधियों और नजदीकी रिश्तेदारों को भी बराबर का प्रेम और दया भेजता है।

इंसान स्वयं को नैतिक तौर से बदले, ताकि वह प्रेम, नम्रता और ईमानदारी के शिखर तक पहुँच सके; इससे उसमें ग्रहणशीलता का जरूरी गुण आ जाएगा। इसके अलावा इंसान को कुछ जोर नहीं लगाना। बाकी सब तो सत्गुरु के हाथों में है।

सत्संग में जाना बहुत ही सहायक होता है। वहाँ आप पवित्र शिक्षाओं का सही अर्थ समझते हैं और ऊँची कहानी जिंदगी के प्रति आपकी आंतरिक भक्ति में वृद्धि होती हैं। इन परमानंद और शांति के निर्मल क्षणों में आप दिव्यता के स्रोत के नजदीक होते हैं और कृपालु गुरु-शक्ति द्वारा अपने बच्चों के लिए भेजी गई जीवन दायी तरंगों से लाभ उठाते हैं।

मुझे यह जानकर खुशी हुई कि सत्संग उन्नति पर है। यह सब सत्गुरु की दया मेहर से है। कृपया निस्वार्थ भाव से कार्य करते जाएँ और जैसे-जैसे आप कार्य करेंगे, आपको ऊपर से और अधिक दिव्य प्रेरणा और दया मिलेगी।

अगर कर्म सही तरीके से और सत्गुरु को समर्पित करके किए जाएँ, तो ये कहानी मुक्ति प्रदान कर सकते हैं। उन्हें बिना किसी सजा के डर या

प्रेम, निस्वार्थ सेवा, बलिदान और आत्म समर्पण माँगता है। जो कोई भी आध्यात्मिक उन्नति की चाह रखता है, वह सेवा मान-बडाई के लिए ना करे । निस्वार्थ सेवा अपने आप में एक इनाम है।

मुझे खुशी है कि सत्संग बढ़ रहा है और टेप के द्वारा सत्संग इतने आनंद के साथ सुना जा रहा है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

नींद अच्छी नहीं आती है तो दिनचर्या को बदलें, समय का पालन करें और कुछ दिन तकनीक अर्थात रेडियो, टी. वी. और मोबाइल से दूर रहें। नियमित व्यायाम करें और स्वस्थ खानपान अपनायें। एवम मधुमेह, डिपरेशन, उच्च व निम्न रक्तचाप, रक्त के थक्के मिरगी के दौरो में मेलाटोनिन हार्मोन से आराम मिलता है। बुरे सपने आते हैं तो मेलाटोनिन सप्लीमेंट लें। उदास मन, चिड़चिड़ापन, पुरुषों में स्तन वृद्धि तथा प्रजनन सम्बन्धी कमियों का मूल कारण मेलाटोनिन हार्मोन की कमी है। पीनियल ग्रंथि में विशेष प्रकार की कोशिकाएं होती हैं जो मेलाटोनिन हार्मोन पैदा करती हैं। ऐसी ही कोशिकायें आंख की रेटिंना और शरीर की दूसरी त्वचा में भी पाई जाती हैं। सभी रोगों और दुखों का मूल कारण मेलाटोनिन हार्मोन की कमी है। जब व्यक्ति बहुत थका हुआ हो, किसी कारण से उसका मन टूटा

### आज्ञा चक्र

हुआ हो, परेशान हो, कोई घातक रोग हो, भयानक पीड़ा हो या चीर फाड़ का कार्य करना हो तो रोगी को ऐसी दवाई देते हैं जिस से उसे नींद आ जाये। इस से एक फायदा तो यह होता है कि रोगी को कष्ट नहीं होता, दूसरा यह कि नींद में मेलाटोनिन हार्मोन पैदा होता है जो रोगों को ठीक करता है।

आज मानव निर्मित मेलाटोनिन हार्मोन और सपलीमेंनटस भी उपलब्ध हैं। ये फायदेमंद तो हैं परंतु डाक्टर की देख रेख में ही लेने चाहिये क्योंकि इन के बुरे प्रभाव होते हैं। कोई भी शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक पीड़ा है तो समझ लो मेलाटोनिन हार्मोन में कमी आ गई है। जिस की प्राप्ति का सहज उपाय है भरपूर गहरी नींद लो। एक और आसान तरीका यह है कि मन में दूसरों के प्रति चींटिग के विचार त्याग दो। चीटिंग के विचार इस हार्मोन में बाधक बन जाते हैं। बहुत लोग छोटी छोटी बातों पर झूट बोलते रहते हैं। अन्दर कुछ बाहर कुछ होते हैं। जब झूट बोलते हैं तो मन में बुरा बुरा महसूस होता है। ऐसे ही और कोई भी संकल्प, बोल वा कर्म करने से अगर बुरा बुरा लगे तो समझो आप में मेलाटोनिन हार्मोन का निर्मा रहा है और आप को रोग लगेगा ही।

ऐसा कोई भी संकल्प, बोल वा कर्म जिस से आप की अ अच्छा लगे तब समझो आप में मेलाटोनिन हार्मोन का निर्माण हो र है। जब भी आप नींद करो तो एक दम गुप अंधेरे में सोया करो। दिन में भी जब सोना हो तो कोशिश किया करो कि गुप अंधेरा हो। इस हार्मोन का निर्माण अंधेरे में होता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक माणूस त्याच्या सासुरवाडीला गेला सासुने त्याला सात दिवस पालकाचेच पदार्थ खायला दिलेत
मग आठव्या दिवशी विचारले - जावई, तुम्ही काय खाणार?
जावई - तुम्ही फक्त मला शेत दाखवा, मी स्वतःच चरेन...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ डोनाल्ड ट्रम्प हे कितव्यांदा 'टाईम पर्सन ऑफ द ईयर' ठरलेले आहेत?

- दुसऱ्यांदा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

ज्कार 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' हा विश्वाला संदेश देणाऱ्या सानेगुरुजींची घडण त्यांच्या आईच्या आचार-विचारांतूनच घडली आहे. श्याम लहान असताना अंघोळ झाल्यावर न्हाणीघरातून (बाथरूम) ओट्यापर्यंत येताना पायाला घाण लागू नये म्हणून आईला खाली पदर पसरावयाला लावत असे. त्या वेळी श्यामची आई त्याला म्हणाली, 'जसे पायाला घाण लागू नये म्हणून तू काळजी घेतोस, अगदी तशीच मनाला घाण लागू नये म्हणून काळजी घेत जा! आपले मन प्रेमळ व निकोप असावे. मनामध्ये इतरांबद्दल नेहमी चांगले विचार ठेवावेत. जएढ चएड

आपल्या पाल्यानेही जगात नावलौकिक मिळवावा. डॉक्टर, इंजिनीअर किंवा याच्यापेक्षाही

### बालकांचे आजार

वेगळे काहीतरी त्यांच्या आवडत्या क्षेत्रात यशस्वीपणे नाव कमवावे. स्वतःच्या आयुष्याबरोबर इतरांचेही हित साधावे, असे वाटत असेल, तर त्याचे गुरू हे तुम्हीच व्हायला हवे. मुलांना वेळ द्यायला हवा. मी असे म्हटल्यानंतर श्लोकची आई म्हणाली, डॉक्टर, आम्ही दोघेही नोकरी करतो. आम्हाला श्लोकसाठी भरपूर वेळ देता येत नाही. त्यावर मी तिला म्हणाले, क्वांटिटी टाईम देण्यापेक्षा क्वॉलिटी टाईम देण्यावर भर दे. जेव्हा कधी श्लोकसोबत राहशील, तेव्हा शंभर टक्के त्यालाच वेळ दे. त्या वेळी टीव्हीवरच्या मालिका किंवा इतरांशी फोनवर बोलणे, चॅटिंग करणे या गोष्टी आवर्जून टाळाव्यात. एकदा का मुले मोठी झाली, की त्यांचा सहवास आजच्या इतका आपल्याला कधीच मिळणार नाही. याची कायम जाणीव ठेव. आनंदाने पालकत्व स्वीकारता यायला हवे. दिवसभराच्या कामाचे नियोजन करून त्यातील ठरावीक वेळ हा मुलांना द्यायला हवा. त्यांच्या बाबांचीही काही कामामध्ये मदत घे. त्यांनाही कधीकधी त्याचा अभ्यास घ्यायला सांग. त्याच्याबरोबर गप्पागोष्टी करणं, त्याच्यासोबत खेळणं, काही वेळेला शांतपणे त्याचे बोलणे ऐकून घेणे या गोष्टींमधून तुम्हाला खूप आनंद मिळेल आणि तोही आनंदी राहील.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सर्वधर्मसमभाव चषक क्रिकेट स्पर्धेत 'के. जी. सरकार संघ' ठरला विजेता

### ३२ संघांचा सहभाग

नगर – सामाजिक सलोखा आणि युवकांमध्ये एकोप्याची भावना वृद्धिंगत होण्यासाठी सर्जेपुरा यंग पार्टीच्या वतीने आयोजित सर्वधर्मसमभाव चषक क्रिकेट स्पर्धेला शहराच्या विविध भागातील संघांकडून प्रतिसाद मिळाला. प्लास्टिक बॉलवर रात्रीच्या फ्लड लाईटमध्ये खेळवण्यात आलेल्या या स्पर्धेत के.जी. सरकार संघाने विजेतेपद पटकावले, तर स्टार संघ उपविजेता आणि सर्जेपुरा ए संघ तृतीय क्रमांकावर राहिला.



सर्वधर्मसमभाव चषक क्रिकेट स्पर्धेत के. जी. सरकार संघ विजेता ठरला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान सभागृहात पार पडले. या कार्यक्रमास यंग पार्टीचे अध्यक्ष दानिश शेख, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाई) शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, उद्योजक विकी इंगळे, पै. यासर शेख, पै. अरबाज शेख, वसीम शेख, मुदस्सर शेख यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात दानिश शेख यांनी

### शहरात खेळातून सलोख्याचा संदेश

शहरातील युवकांना एकत्र आणून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. खेळाच्या माध्यमातून सलोखा वाढवण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


विक्की इंगळे म्हणाले की, राजकीय स्वार्थासाठी जातीयतेची बीजे पेरली जात आहेत. मात्र सर्जेपुरा यंग पार्टीने सर्वधर्मसमभाव जपणारी ही स्पर्धा आयोजित करून दिशादर्शक उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले.

सुशांत म्हस्के म्हणाले की, सर्व समाजातील युवकांनी एकत्र येवून स्वत:ची प्रश्न स्वत: सोडवली पाहिजे. युवक आर्थिक फायद्यासाठी राजकारण्यांच्या दावणीला बांधली जात असताना त्यांचा वापर जातीयवादासाठी केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आदिल शेख यांनी विजेत्या संघांना शुभेच्छा दिल्या.

३२ संघांचा सहभाग लाभलेल्या या स्पर्धेमध्ये अंतिम तीन विजेत्या संघांना अनुक्रमे ८,००० रुपये (प्रथम), ५,००० रुपये (द्वितीय), व ३,००० रुपये (तृतीय) रोख बक्षिसे, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अबरार शेख यांनी तर संयोजनासाठी फारुख नालबंद, असिफ शेख, आदिल शेख, जावेद सय्यद, राजू शेख, मुबिन शेख, मतीन शेख, अखिल सय्यद, जफर शेख, अयान नालबंद, अरबाज खान, सलमान शेख, जैद शेख, शारुख शेख, मुद्दू शेख आदींनी परिश्रम घेतले.

# माऊली जन्मोत्सव निमित्त आळंदी येथील वीणा मंडपात नगर येथील सराफ निळकंठ देशमुख महाराजांचे प्रवचन



नगर – नामस्मरण भगवंत प्राप्तीचे समाधान करून देणारा सोपा आणि सुलभ मार्ग असून नाम संकीर्तन साधन पै सोपे या तुकोबांच्या वचनाचा दिव्य आत्मिक आनंद यातून होत असतो. अनादिकालापासून सत्य युगात ध्यानात, तप या साधना होत्या. पुढे त्रेता युगात यज्ञादि विधी आले. पुढे द्वापर युगात पूजा पाठ विधी आला. व आता कली युगात फक्त नामस्मरण हा एकच विधी असून मानवाच्या जीवनातील हाच खरा परमेश्वराची अनुभूती देणारी खरी उपासना आहे, असे चिंतन ह.भ.प निळकंठ देशमुख महाराज यांनी केले.

आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचा ७५० वा जन्मोत्सव चालू आहे. या निमित्ताने पवित्र अशा मुख्य वीणा मंडपात जोग महाराज, मामासाहेब दांडेकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ ह.भ.प कुंडलिक महाराज खिरमुठे यांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर जन्मोत्सवाचे औचित्य साधून गेल्या ३० वर्षांपासून चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात ह.भ.प. निळकंठ देशमुख महाराज आपल्या कीर्तनात बोलत होते.

आळंदीच्या इंद्रायणी तीरी असलेल्या वीणा मंडपाचे आणि त्याचे पावित्र्य यांस येथे महत्वाचे स्थान आहे.

ज्ञानेश्वर माऊलींच्या समोर असलेल्या मंडपात पूर्वीपासून अखंड वीणा वादन चालू असते. हैबतबाबा यांची समाधी माऊली मंदिरात असून हैबतबाबा जेंव्हा येथे भजन करीत त्यावेळी माऊली. समाधी डोलत असे अशी आख्यायिका आहे. अशा या मंडपात थोर विभूतींनी आपल्या कीर्तन, प्रवचनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले आहे. अशा या पवित्र मंडपात देशमुख महाराजांना कीर्तन करण्याचा योग आला आहे.

ह. भ. प देशमुख यांनी ज्ञानेश्वरीतील १० वा अध्याय, विभूती योगातील नाम, जप, यज्ञ या ओवींवर आपले चिंतन मांडले.

ह.भ.प निळकंठ देशमुख हे अहिल्यानगर येथील सराफ असून त्यांची सराफ बाजारात सुवर्ण पेढी आहे. शहरातील विविध धार्मिक कार्यात त्यांचा नेहमी सहभाग असतो.

प्रवचनाला डॉ.नारायण महाराज जाधव, ह.भ.प भागवत महाराज दळवी, हेमंत झेंडे, अहिल्यानगर येथील बाळासाहेब देशपांडे उद्यानातील (सिद्धी बाग) भजनी मंडळ, आनंद देशमाने, योगेश देशमाने यांच्यासह विविध भागातून आलेली संत मंडळी, भाविक उपस्थित होते.

# 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे १८ जूनला नगरमध्ये आयोजन

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर येथे नोकरी इच्छुक उमेदवारांकरीता 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे १८ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजन करण्यात आले आहे. इच्छूक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पुर्ण करून रोजगाराच्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

या उपक्रमामध्ये जिल्ह्यातील दोन उद्योजक सहभागी होऊन प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करणार आहेत. या उपक्रमात एच.एस.सी., आय.टी.आय., पदवी, पदव्यूत्तर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांना जागेवर नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापपर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. तसेच लॉगीन करुन शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी आवेदन सादर करावे. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र प्रशासकीय इमारत, पहिला मजला, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात. तसेच www.ncs.gov.in या संकेतस्थळावर जास्तीत जास्त उमेदवांनी सहभाग नोंदवावा व संधीचा लाभ घ्यावा.

अधिक माहितीसाठी समन्वयक वसीमखान पठाण यांच्याशी ९४०९५५५४६५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# रक्तदानातून जीवनदान, समाजासाठी आमची जबाबदारी

**किसनलाल बंग यांचे प्रतिपादन; श्री माहेश्वरी युवा संगठन आयोजित व रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसा. लि. प्रायोजित शिबिरात १८१ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन**



श्री माहेश्वरी युवा संगठन आयोजित व रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसा. लि. प्रायोजित रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नगर – समाजाच्या आरोग्यविषयक गरजांमध्ये आपले योगदान देणे ही आपल्या संस्थेची सामाजिक जबाबदारी आहे. रक्त हे कोणत्याही प्रयोगशाळेत बनवता येत नाही; ते केवळ माणुसच दुसऱ्या माणसाला देऊ शकतो. अशा वेळी रक्तदानासारखा उपक्रम केवळ आरोग्यसेवाच नव्हे, तर तो एक प्रकारचा जीवनदानाचा संकल्प आहे. समाजातील तरुणांनी व महिला सदस्यांनी देखील पुढाकार घेतला, हे विशेष उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसा. लि. चेअरमन किसनलाल बंग यांनी केले.

श्री माहेश्वरी युवा संगठन आयोजित व रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसा. लि. प्रायोजित रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला प्रतिसाद मिळून एकूण १८१ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले. यावेळी प्रतिक सारडा व मनिष नावंदर, रामकृष्ण संचालक मंडळाचे सदस्य अनिल राठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे बोलताना बंग म्हणाले की, आजच्या या धकाधकीच्या युगात, युवक जर अशा उपक्रमात पुढे येत असतील, तर समाजाचे भविष्य नक्कीच उज्वल आहे. रामकृष्ण अर्बन सोसायटी केवळ आर्थिक कामकाजापुरती मर्यादित न राहता सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सतत कार्यरत राहील. आमच्या संस्थेचे संपूर्ण संचालक मंडळ व कार्यकर्ते यासाठी सदैव कटिबद्ध आहेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्ष शाम भुतडा, सचिव संकेत मानधने, विशाल झंवर, अमित खटोड, अभिनंदन कालाणी, अनिकेत बलदवा, भूषण काबरा, प्रणव बिहाणी, गोविंद दरक, गोविंदा जाखोटिया, गोविंदा काकाणी, कुणाल लोया, मधुर बिहाणी, मुकुंद जाखोटिया, पवन बंग, पवन बिहाणी, पियुष झंवर, प्रतीक सारडा, ऋषीकेश बजाज, संग्राम सारडा, संकेत अट्टल, शेखर असावा, योगेश सोमाणी, सुमित बिहाणी, सुमित चांडक, वेदांत बजाज तसेच व्हा.चेअरमन जवाहरलाल मालू, श्रीगोपाल धूत, लक्ष्मीकांत झंवर, अनुराग धूत, ओमप्रकाश चांडक, मणियार गोपाल, कासट विश्वनाथ, सारडा मधुसूदन, बंग अशोक, कंत्रोड राजेंद्रकुमार, सौ. मिनियार राजकमल, सौ. राठी शोभा आदी उपस्थित होते.

शिबिरास जनकल्याण रक्तपेढी व आनंदऋषीजी ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. गोविंद मनियार यांनीदेखील रक्तदान केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनात रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीचे संचालक, कर्मचारी, स्वयंसेवक व माहेश्वरी युवा संगठनाच्या कार्यकर्त्यांचे योगदान लाभले. सूत्रसंचालन संकेत मानधने यांनी केले.

# वाचकपीठ प्रतिष्ठानच्या वर्धापन दिनानिमित्त १८ जून रोजी श्रीकांत ढेरंगे यांचे व्याख्यान

नगर – वाचावे ते आम्ही या बोध वाक्याचे अनुसरण करणारे वाचकपीठ प्रतिष्ठान आपल्या स्थापनेचा पाचवा वर्धापन दिन साजरा करीत आहे. या निमित्ताने १८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता कवी, लेखक, पत्रकार श्रीकांत ढेरंगे यांचे मराठी भाषा संवर्धन आणि वाचन संस्कृती या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत भोसले व प्रसिध्दी प्रमुख शिरीष जाधव यांनी दिली.

कोविड काळामध्ये साहित्य, नाट्य, कला, संस्कृती ही ज्ञानवर्धनाची सर्व दालने बंद झालेली असताना प्राचार्य चंद्रकांत भोसले, भास्कर निर्मळ पाटील तसेच इतर समविचारी मित्रांनी एकत्र येऊन जून २०२० मध्ये वाचकपीठची स्थापना केली. वाचकपीठच्या माध्यमातून त्यांनी दर महिन्याला एका उत्तम काव्यसंग्रहाची निवड करून त्यावर साहित्य क्षेत्रातील तज्ञ, कवी, लेखक, साहित्यिक यांच्याद्वारे चर्चा घडवून आणण्यासाठी ऑनलाइन काव्यचर्चेचा कार्यक्रम सुरू केला. आजपर्यंत काव्यचर्चेचे एकूण ६१ कार्यक्रम संपन्न झालेले आहेत व त्यातून साहित्य क्षेत्रातील १७५ पेक्षा जास्त विद्वानांनी वेगवेगळ्या कवींच्या कवितासंग्रहांवर अभ्यासपूर्ण भाष्य केले आहे. या काव्य चर्चेत समाविष्ट असलेल्या अनेक कवितासंग्रहांना राज्य स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर विविध पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले आहे ही वाचकपीठच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे.

तसेच या उपक्रमाचे वैशिष्ट्य असे की मासिक काव्य चर्चेसाठी निवडलेला कवितासंग्रह वाचकपीठचे सर्व सदस्य दर महिन्याला स्वखर्चाने विकत घेतात, त्याचा अभ्यास करतात आणि मग त्यावर भाष्य केले जाते. या अभिनव वाचकपीठ प्रतिष्ठानला या महिन्यात पाच वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचे औचित्य साधून बोटा येथील कवी, साहित्यिक, पत्रकार श्रीकांत ढेरंगे यांचे मराठी भाषा संवर्धन आणि वाचन संस्कृती या विषयावर १८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता ऑनलाईन माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व रसिकांनी व श्रोत्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन वाचकपीठ प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची लिंक वाचकपीठच्या वाचकपीठ–आपली कविता या फेसबुक पेज वरून प्रसारीत करण्यात आलेली असून हा कार्यक्रम याच फेसबुक पेजववरून थेट प्रसारीत करण्यात येणार आहे.



ऑक्झीलियम स्कुलच्या नवीन मुख्याध्यापिका सिस्टर मारिया यांचा सत्कार करताना जाणिव फाऊंडेशनचे प्रदीप वाखुरे, मॅनेजर सिस्टर रिटा लोबो, ॲड. व नोटरी पब्लिक विक्रम वाडेकर, विश्वस्त मोहटा देवस्थान, राहुल जोशी, ॲड. व इंजिनीअर कैलाश दिघे, संजय माने व विकास गायकवाड.

# नगरमध्ये २३ जून रोजी विभागीय डाक अदालत

नगर – पोस्टाच्या कार्यपद्धती विषयी किंवा कामकाजाबद्दल तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसलेल्या तक्रारींच्या निवारणासाठी वरिष्ठ अधीक्षक डाकघर, हेड पोस्ट ऑफीस, दुसरा मजला अहिल्यानगर यांच्या कार्यालयात २३ जून रोजी सकाळी ११ वाजता विभागीय डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, डाक वस्तू, पार्सल, बचत बँक व मनी ऑर्डर बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार आहेत. तक्रारीमध्ये ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठविली असेल त्या अधिकाऱ्यांचे नाव, हुद्दा व पाठवल्याचा दिनांक नमूद करुन १९ जूनपर्यंत अर्ज दोन प्रतींमध्ये सादर करावेत. एका अर्जासोबत एकच तक्रार दाखल करावी. अदालतीस तक्रारदारास स्वखर्चाने यावे लागेल. त्यासाठी कुठलाही भत्ता दिला जाणार नसल्याचे वरिष्ठ अधीक्षक, डाकघर, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

# हेल्दी डे च्या माध्यमातून अहिल्यानगरमधील न्युरॉन प्रीस्कूलमध्ये भाजीपाला दिवस साजरा



न्युरॉन प्रीस्कूलमध्ये राष्ट्रीय भाजीपाला दिवस हेल्दी डे च्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

नगर – मुलांच्या आहारात ताजे फळ व भाज्यांचता समावेश असणे अतिशय महत्त्वपूर्ण असल्याने त्यांच्या आरोग्यासाठी याचा बहुमूल्य योगदान आहे. मुलांचा सर्वांगिण विकास व पोषणाच्या दृष्टीने दैनंदिन आहारात भाज्यांचा समावेश असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन न्युरॉन प्रीस्कूलच्या संचालिका व प्राध्यापिका डॉ.सौ. संगीता मिसाळ यांनी केले.

शहराच्या मध्यवर्ती स्थित न्युरॉन प्रीस्कूलमध्ये १७ जून रोजी राष्ट्रीय भाजीपाला दिवस साजरा करण्यात आला. हा दिवस पौष्टिक वनस्पती आधारित आहारासाठी समर्पित आहे. निरोगी व संतुलित आहाराच्या महत्त्वाकडे लक्ष आणि जागरुकता आणण्यासाठी एक मार्ग म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

मुलांना सामान्यतः भाज्यांबद्दल तिटकारा असतो आणि हा तिटकारा त्यांच्या प्रौढावस्थेपर्यंत टिकून राहतो. ज्यामुळे त्यांना पोषक आहार मिळत नाही.

शाळेच्या प्राध्यापिका स्वतः वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे त्या आपल्या विद्यार्थ्यांच्या आहाराकडे व त्यांना मिळणाऱ्या पोषक तत्त्वांकडे जातीने लक्ष देतात व पालकांनाही जागरुक करतात तसेच विद्यार्थ्यांच्या डब्यात हेल्दी फूडवर भर दिला जातो.

आज नन्युरॉन प्रीस्कूलमध्ये हेल्दी डे राष्ट्रीय भाजीपाला दिवस या स्वरूपात साजरा करण्यात आला. व मुलांना जंक फूडचे दुष्परिणाम व हेल्दीफूडचे फायदे या विषयावर शिक्षिका सौ. स्वाती डोंगरे व शाळेच्या को–ऑर्डिनेटर सौ. कविता शिंदे यांनी मनोरंजक नाटिका सादर केली.

# डॉक्टर योगेश गरुड याची 'एमसीएच सर्जिकल ऑन्कोलॉजी पदव्युत्तर पदवी' यशस्वीरित्या पूर्ण



नगर – ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (AIIMS) या वैद्यकीय संस्थेतून डॉ. योगेश गरुड यांनी MCh सर्जिकल ऑन्कोलॉजी (कॅन्सर शस्त्रक्रिया) ही पदव्युत्तर पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.

डॉ. योगेश गरुड यांनी MBBS, MS (जनरल सर्जरी) आणि MCh (सर्जिकल ऑन्कोलॉजी) ही सर्व शैक्षणिक पदव्या पहिल्याच प्रयत्नात पूर्ण करत, अत्यंत कमी वयात हा विक्रम केला आहे. त्यामुळे त्यांचे नाव भारताच्या सर्वात तरुण कॅन्सर सर्जनांमध्ये गणले जात आहे, तेही देशातील सर्वोच्च वैद्यकीय संस्था AIIMS मधून शिक्षण पूर्ण करून – हे निश्चितच गौरवाचे आणि अभिमानाचे आहे.

डॉ. योगेश गरुड हे अहिल्यानगर येथील गरुड हॉस्पिटल येथे सेवा देणार आहेत. त्यांच्यासोबत या रुग्णालयात त्यांचे आईवडील डॉ. प्रकाश आणि डॉ. पद्मजा गरुडदेखील कार्यरत आहेत.

# येणाऱ्या निवडणुकीत भाजपच्या उत्तर महाराष्ट्र विभागाला घवघवीत यश मिळेल

**ना. गिरीश महाजन यांचा विश्वास; अहिल्यानगर पदाधिकाऱ्यांचा उत्तर महाराष्ट्र बैठकीत सत्कार**

जळगाव – महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या निवडणुकीत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र भाजपमय झाला आहे. तसेच भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात भाजप हा एक नंबरचा पक्ष झाला आहे. विधानसभेमध्ये १४९ पैकी १३७ जागा जिंकून भाजपाने ९३ ते ९४ टक्केचा स्ट्राईक रेट केला आहे. निवडणुका चार महिन्यांवर आल्याने निवडणुका जिंकण्यासाठी शेवटच्या कार्यकर्त्यांपर्यंत आपण पोहोचलो पाहिजे. तसेच संघटना मजबूत असली पाहिजे. व पक्षाचे विचार ध्येयधोरण व शासकीय योजना गावखेड्या पर्यंत पोहोचण्यासाठी कार्यकर्त्यांनी कार्य करावे. तसेच उत्तर महाराष्ट्रात सर्वात जास्त नगरसेवक, सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष निवडून आणण्यासाठी सर्वांनी परिश्रम घ्यावे. तसेच निवडणूक एक हाती जिंकण्यासाठी शेवटच्या माणसांपर्यंत हितगुज साधावे. येणाऱ्या निवडणुकीत भाजपाच्या उत्तर महाराष्ट्र विभागाला घवघवीत यश मिळेल, असा विश्वास कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.



जळगाव येथील इन्फिनिटी हॉटेलमध्ये येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर महाराष्ट्र विभागाची आढावा बैठक झाली.

जळगाव येथील इन्फिनिटी हॉटेलमध्ये येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर महाराष्ट्र विभागाची आढावा बैठक झाली. या बैठकीत अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक या जिल्ह्यातील जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व मंत्री गिरीश महाजन, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, प्रदेश मुख्यालय प्रभारी संघटनमंत्री रविंद्र अनासपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. यावेळी अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष नरेश चव्हाण, सावेडीचे मंडलाध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे, केडगावचे मंडलाध्यक्ष भरत ठुबे, भिंगारचे मंडलाध्यक्ष सचिन जाधव, अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष शाहीर शेख आदी उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण म्हणाले, निवडणुका जिंकण्यासाठी पक्ष संघटन मजबूत असले पाहिजे. कार्यकर्ता कसा असावा. हे रामभाऊ म्हाळगी यांनी सांगितले आहे. कार्यकर्त्याच्या पायाला भिंगरी असावी. कार्यकर्त्याच्या जिभेवर साखर व डोक्यावर बर्फ असावा. पक्षाचे विचार व शासकीय योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कार्य करावे.

उत्तर महाराष्ट्राच्या बैठकीत अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीची स्वतंत्र बैठक घेण्यात आली. यात येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते व पदाधिकाऱ्यांचा ना. गिरीश महाजन यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी अनिल मोहिते म्हणाले, पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी परिश्रम घेण्यात येतील. तसेच येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला बहुमत मिळण्यासाठी संघटनात्मक कार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.



### ऑनररी डॉक्टरेटने डॉ. दीपक हरके सन्मानित

गोवा येथील सी ब्रिज सरोवर पोर्टिको हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात देशविदेशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा ऑनररी डॉक्टरेट देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार करण्यासाठी १८३ विश्वविक्रम केल्याबद्दल ग्लोबल युनिव्हरसिटी बोस्टनकडून गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते वर्ल्ड रेकॉर्डमध्ये ऑनररी डॉक्टरेट देऊन गौरव करण्यात आला.



सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत विद्यार्थिनींचे गुलाब फूल देऊन स्वागत व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

## सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत विद्यार्थिनींचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत व पाठ्यपुस्तकांचे वाटप

नगर – मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या संचालनाखालील सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळा, मुकुंदनगर येथे नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थिनींना गुलाब देऊन स्वागत करण्यात आले व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थापक आणि प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुस सलाम, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, हसीब शेख, मुख्याध्यापक नौशाद सैय्यद, तसेच असलम पटेल, यास्मिन शेख, फरजाना शेख, शाहीन शेख, शेख सुलताना आणि शेख हीना, शेख उजमा उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मुख्याध्यापक नौशाद सैय्यद आणि त्यांच्या संपूर्ण शिक्षकवर्गाचे पालकांनी कौतुक केले.

## रेड कार्पेट व फुलांच्या पायघड्या, अलिशान चारचाकी गाडी व बुलेटच्या स्वारीने वाजतगाजत मिरवणुकीने चिमुकल्यांचे स्वागत

नगर – रेड कार्पेटवर फुलांच्या पायघड्या, खेळण्यातील अलिशान चारचाकी गाडी व बुलेटच्या स्वारीने वाजत गाजत मिरवणुक, सर्वत्र फुगेच फुगे अशा जल्लोषात व अनोख्या पद्धतीने नवगतांचे स्वागत बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत करण्यात आले. या उत्साही वातावरणात शाळेतील विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्षास सोमवारी सुरुवात झाली.



बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करत रेड कार्पेटवर फुलांच्या पायघड्या घालून खेळण्यातील आलिशान चारचाकी गाडी व बुलेटच्या स्वारीने वाजत गाजत मिरवणुकीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा.शिरीष मोडक, मधुसूदन सारडा, प्रा.ज्योती कुलकर्णी, डॉ. रवींद्र सोमाणी, मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदींसह शिक्षक व नवागत विद्यार्थी.

### हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत रंगला चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव

दरवर्षी नवनवीन व वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेने शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांचे स्वागत करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत चिमुकल्यांचा शाळेतील प्रवेशोत्सव रंगला. शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांच्या संकल्पनेतून हा अनोखा प्रवेशोत्सव उपक्रम राबवला गेला. शाळेत पहिल्यांदा आलेल्या चिमुकल्यांचे व सर्व विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा सजली होती. वाजंत्रीच्या तालात तसेच रेड कार्पेटवर फुलांच्या पायघड्या घालून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी चिमुकल्यांनी खेळण्यातील आलिशान चारचाकी गाडी व बुलेटच्या सवारीचा आनंद घेतला. त्यांची छोटीशी वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या उत्साही स्वागताने विद्यार्थी व पालक भारावून गेले होते.

यावेळी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, शाळा समितीचे चेअरमन मधुसूदन सारडा, प्रा.ज्योती कुलकर्णी, प्रमुख पाहुणे डॉ. रवींद्र सोमाणी, शाळेचे सदस्य रवींद्र गुजराथी व संजय लोढा आदींसह सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व खाऊ देण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळून अभ्यासासह खेळाला प्राधान्य द्यावे : आयुक्त

### महानगरपालिकेच्या रेल्वे स्टेशन शाळेत औक्षण करून व गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

नगर – सध्याच्या स्पर्धेच्या युगात महानगरपालिकेच्या शाळांमधूनही विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाचे शिक्षक करत आहेत. विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण वाढणार नाही, अशा पद्धतीने त्यांना नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शिक्षण देण्याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा. विद्यार्थ्यांनीही मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळून अभ्यासासह खेळालाही प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.



महापालिकेच्या रेल्वे स्टेशन शाळेत औक्षण करून व गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

महानगरपालिकेच्या रेल्वे स्टेशन येथील शाळेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. शाळेच्या वतीने समग्र शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, शूज इत्यादीचे वाटप करण्यात आले. यशवंत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून शाळेत 'अतिसारावर करूया मात, स्वच्छ व ओआरएसची घेऊन साथ' हा उपक्रमही राबवण्यात आला.

जिजामाता आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. शेख यांनी अतिसार होऊ नये म्हणून घ्यावयाची दक्षता, तसेच अतिसार झाल्यास करावयाच्या उपायोजना विद्यार्थ्यांना समजून सांगितल्या. या उपक्रमांतर्गत हात धुण्याचे प्रात्यक्षिक, ओआरएस बनवण्याचे प्रात्यक्षिक, डेंग्यू आळ्या तसेच गप्पी मासे दाखवून विद्यार्थ्यां–मध्ये जनजागृती करण्यात आली.

शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप बागल, साथरोग अधिकारी सृष्टी बनसोडे, आरोग्य अधिकारी आयेशा शेख, स्टाफ नर्स, परिचारिका, आशा सेविका, अंगणवाडी सेविका आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक विजय घिगे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले. भारती कवडे, मनीषा गिरमकर, वर्षा गायकवाड, विठ्ठल आठरे, मेघना गावडे, दीपाली नवले, शबनम खान यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



नेप्ती येथील जि.प. शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिला दिवशी विद्यार्थ्यांना दप्तरांचे मोफत वाटप करण्यात आले.

## नेप्ती शाळेत विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच उन्हाळी सुट्टी संपवून शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांनी शाळा गजबली होती. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

औटी कुटुंबीयांतर्फे अभिजीत औटी यांच्या पुढाकाराने गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तराचे वाटप करण्यात आले. यासोबतच शासनाच्या समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश व शूजचेही वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका पद्मा मांडगे यांनी शाळेतील विविध उपक्रमांची माहिती दिली.

या उपक्रमासाठी वंदना औटी, अभिजीत औटी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब होळकर, माजी उपसरपंच जालिंदर शिंदे, रामदास फुले, लहू फुले, आकांक्षा भुजबळ, सोनाली कदम, मुख्याध्यापिका पद्मा मांडगे, सुरेश कार्ले, आशा ढोले, नूतन पाटोळे, मिना नायगावकर, अश्विनी औटी, शोभा औटी, सुभाष नेमाने, अमोल चौगुले, दत्तू कांडेकर आदी उपस्थित होते.



निर्मलनगर येथील डोके विद्यालयाच्यावतीने विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, ज्योती पवार, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, राणी राऊत, संजोत बर्वे. (छाया – विजय मते)

## डोके विद्यालयात नवागतांचे स्वागत

नगर – निर्मलनगर येथील डोके विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आले. या वेळी लक्ष्मीबाई शांताराम डोके समाज विकास प्रतिष्ठानच अध्यक्ष बापूसाहेब डोके, समन्वय समितीचे कारभारी गायकवाड, छबुराव ठोकळ, शोभा भालेराव, बाळू वाघुले मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, संभाजी पवार,ज्योती पवार, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, राणी राऊत, संजोत बर्वे, आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन मंदाकिनी पांडूळे यांनी केले. आशा धामणे यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, पालक उपस्थित होते. नवीन पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदून गेले होते.

## सेंट विवेकानंद स्कूलच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

नगर – अहमदनगर सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळेत येण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. २०२५–२०२६ या नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळा सज्ज होती. याप्रसंगी शाळेत विविध प्रकारची सजावट करण्यात आली होती. संपूर्ण शालेय परिसर, वर्ग खोल्या सजवून सुशोभित करण्यात आल्या होत्या. संस्थेचे सचिव गोपाल भागवानी, सेक्रेटरी दामोदर माखिजा, माध्यमिकच्या प्राचार्या गीता तांबे, प्राथमिकच्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा तसेच सर्व शिक्षकवृंद शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होत्या. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांचे फुलांच्या वर्षावात व बिस्कीट वाटप करून स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शिक्षिकांनी विद्यार्थ्यांसाठी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.चांदणी सोनाग्रा व शिरीन शेख यांनी केले. पूर्वप्राथमिक व इयत्ता पहिलीतील नव्याने प्रवेश केलेल्या बालचिमुकल्यांचे स्वागत करण्यासाठी सुंदर असा सेल्फी स्टॅन्ड बनवण्यात आला होता. या सेल्फी स्टॅन्ड मध्ये विद्यार्थ्यांनी फोटो काढण्याचा आनंद लुटला. तसेच पूर्व प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या पहिल्या दिवसाची आठवण म्हणून आपल्या हाताचे ठसे उमटवण्याच्या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.



सेंट विवेकानंद स्कूलच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करताना शिक्षक–शिक्षिका व संस्थाचालक.

प्राथमिकच्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिस्त व नियमितपणा अंगीकारण्याचा मंत्र सांगितला.

तसेच शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी मुलांना या वर्षात नवीन संकल्प करून आपली शैक्षणिक प्रगती कशी साधता येईल याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी तसेच सचिव गोपाल भागवानी यांनी विद्यार्थ्यांना नवीन वर्षात उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी व हरेष मध्यान यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## विद्यारंभ संस्काराने चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात

नगर – चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये २०२५–२६ या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आध्यात्मिक, मंगलमय वातावरणात विद्यारंभ संस्कार, होम–हवन आणि सरस्वती पूजन अशा पारंपरिक विधींनी झाली.

सरस्वति नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणि । विद्यारम्भं करिष्यामि सिद्धिर्भवतु मे सदा ।। या मंत्रोच्चारासह ज्ञानाची देवी असलेल्या सरस्वती मातेला वंदन करून विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक वाटचालीला शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे सीइओ अशोक सचदेव यांच्या हस्ते विधिवत पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने 'सरस्वती यंत्र' तयार करून त्यावर 'ॐ' आणि 'अ' ही विद्येची सुरुवात करणारी अक्षरे लिहिली. हा प्रसंग विद्यार्थ्यांसाठी भक्तिभाव व प्रेरणेचा अनुभव ठरला. होम–हवन विधीत शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी सामूहिक सहभाग घेत मंत्रोच्चारासह आहुती अर्पण केल्या. या प्रक्रियेत संपूर्ण परिसर भक्तिपूर्ण आणि सकारात्मक उर्जेने भारावून गेला.



चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये २०२५–२६ या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आध्यात्मिक, मंगलमय वातावरणात विद्यारंभ संस्कार, होम–हवन आणि सरस्वती पूजन अशा पारंपरिक विधींनी झाली.

कार्यक्रमाची सांगता सामूहिक गणपती आरती आणि हनुमान चालीसा पठणाने झाली. त्यानंतर प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची समाप्ती आनंदमय वातावरणात करण्यात आली.



हिंदसेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी आकर्षक फुग्यांची कमान व फुलांची सजावट करण्यात आली होती.

## श्री शाहू विद्या मंदीरमध्ये नवागतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

निंबळक – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित श्री शाहू विद्या मंदीर खडांबे ता. राहुरी येथील विद्यालयात १६ जून रोजी शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ ची सुरुवात शासन आदेशानुसार विद्यार्थी प्रवेशोत्सव साजरा करून झाली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्प हार अर्पण करून करण्यात आली. विद्यालयात या वर्षी इ.५ वी ते ८ वी च्या वर्गात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे ढोल–ताशांच्या गजरात व गुलाबपुष्प देऊन जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्षीय निवड विद्यालयाचे पर्यवेक्षक व सेकंडरी टीचर्स को ऑपरेटिव्ह सोसायटीचे विद्यमान चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कृषिभुषण सुरसिंगराव पवार यांनी भूषविले.



(छाया – संदीप बांगर)

विद्यालयाचे मुख्याध्यापक मकरंद रायते यांचा विद्यालय व ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तकांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील सेवक बाळासाहेब मेहेत्रे हे जूनअखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असून त्यांनी स्वखर्चाने शाळेच्या कार्यालय इमारतीस रंगकाम केल्याबद्दल पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी भानुदास कल्हापूरे, अशोक हरिश्चंद्रे, प्रभाकर हरिश्चंद्रे, संतोष कार्ले, संजय रोकडे, संदीप बांगर, प्रसाद साठे, गणेश कुर्हे, तुकाराम कोरडे, प्रकाश थोरात, अंजली आसाल, मंजुश्री डंबरे, योगीता म्हस्के, मंजुषा दरेकर, शैलजा कल्हापूरे, प्रियंका कोरडे, सुषमा लटके, अनुराधा भोकरे, संतोष शेळके, सागर कल्हापूरे, मिनीनाथ कुसमुडे, श्रीकांत म्हसे, कानिफनाथ दुशिंग, जयराम राहणे, बाळासाहेब मेहेत्रे, अविनाश अमृते आदि शिक्षक व शिक्षकेतर सेवकवृंद उपस्थित होते.

सूत्रसंचालन राहूल जाधव यांनी केले. अर्जुन लंगोटे यांनी आभार मानले.

## सीताराम सारडा विद्यालयात शालेय साहित्य व गुलाब पुष्प देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

नगर – हिंदसेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी आकर्षक फुग्यांची कमान व फुलांची सजावट करण्यात आली होती. नवागत विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात स्वागत करून शालेय साहित्य व गुलाब पुष्प देण्यात आले. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, हिंद सेवा मंडळाचे कार्यकारणी सदस्य मधुसूदन सारडा, डॉ. पारस कोठारी, ज्योतीताई कुलकर्णी, शालेय समिती सदस्य ईश्वर बोरा, संजय मुदगल, मुख्याध्यापिका डॉ.मंगला भोसले, पर्यवेक्षक गोविंद धर्माधिकारी, हिंदसेवा मंडळाचे सेवकांच्या पतपेढीचे अध्यक्ष दीपक आरडे, अशोक डोळसे, सुनील कुलकर्णी, लोखंडे सर, अमोल कदम, दीपक शिरसाट, नितीन केणे, रवींद्र चोभे, गोवर्धन पांडुळे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मधुसूदन सारडा, डॉ.पारस कोठारी, ज्योतीताई कुलकर्णी, ईश्वर बोरा, संजय मुदगल आदींची भाषणे झाली.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका डॉ.मंगला भोसले यांनी केले. सूत्रसंचालन दीपक आरडे यांनी केले. गोविंद धर्माधिकारी यांनी आभार मानले.

# अंड्याची गरमागरम भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंड्याची भजी ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य :** चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.

**कृती :** उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओला आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.



# जोश

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# परदेशी नोकरी सोडून सुरू केला दह्याचा ब्रँड



अचिव्हर

अनेक लोक परदेशात चांगली नोकरी मिळवून तिथेच स्थायिक होण्याचे स्वप्न पाहतात, पण केरळमधील रहिवासी नहज बशीर यांनी परदेशातील नोकरी सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला आणि दही बनवण्याचा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु कठोर परिश्रमाने नहजने व्यवसायात यश मिळवले. आज नहज बशीर त्यांच्या 'क्रॅनबेरी' या ब्रँडमधून दरवर्षी १५ कोटी रुपयांची कमाई करत आहेत. इतकेच नाही तर अंबानी कुटुंबदेखील क्रॅम्बेरीचे ग्राहक आहे. नहज बशीर यांचा जन्म केरळमध्ये झाला. त्यांचे कुटुंब टिश्यू मॅन्युफॅक्चरिंग व्यवसाय करत असे. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी नहजला कतारमध्ये नोकरी मिळाली, पण त्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा होता. अशा परिस्थितीत नहजने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि तो भारतात परतला.

**कुटुंब नाराज; पण**


नहजचे कुटुंब त्याच्या या निर्णयावर खूश नव्हते, मात्र नहजच्या आईने त्याला पाठिंबा दिला. कतारमध्ये नोकरी करताना नहज भारतात यायचा त्यावेळी भारतात चांगल्या आणि आंबट दह्याची मोठी कमतरता असल्याचे त्याला जाणवायचे. नहजला कतारमध्ये मिळणारे दही आवडले. त्यातूनच त्याला दह्याचा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. २०२० मध्ये नहजने क्रॅनबेरी नावाची कंपनी सुरू केली.

**दही ब्रँड यशस्वी**

ही कंपनी अनेक चवींसह विविध प्रकारचे दही बनवते. हळूहळू, नहजचा ब्रँड यशस्वी झाला. नहज स्वतः मॉलमध्ये जाऊन दह्याचे नमुने वाटून लोकांना त्याचे उत्पादन सादर करत असे. अल्पावधीतच नहाजचे दही खूप लोकप्रिय झाले. अंबानी कुटुंबदेखील क्रॅनबेरीचे ग्राहक आहे. क्रॅनबेरीने अंबानी कुटुंबातील दोन्ही मुलांच्या लग्नात दहा हजारांहून अधिक दह्याचे पॅकेट डिलिव्हर केले होते. नहाज या व्यवसायातून दरवर्षी १५ कोटी रुपयांपर्यंत कमाई करत आहे.

# हा गुंता कधी सुटेल?

मॅच मेकिंग



मी २८ वर्षांची तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम आहे. पण पालकांना तो आवडत नसल्यामुळे त्यांनी माझं लग्न दुसऱ्या मुलाशी ठरवलं आहे. याबाबत मी माझ्या प्रियकराला सांगितलं. हे नातं तोडायचं ठरवलं. पण मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही, असं त्याचं म्हणणं आहे. या सगळ्या परिस्थितीसाठी तो मला जबाबदार धरतो आहे. या सगळ्याचा मला खूप ताण आला आहे. मी आईवडिलांच्या विरोधात जाऊ शकत नाही. प्रियकरालाही सोडू शकत नाही. मी काय करू?

– तुझी सध्याची मनस्थिती खूप गुंतागुंतीची असणार यात शंका नाही. या नात्याबद्दल तू आईशी बोललीस. तिच्याकडून तुला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अशा परिस्थितीत तू कुटुंबातल्या इतर सदस्यांचा आधार घेऊ शकतेस. तुझ्या वडिलांशी स्पष्टपणे बोलू शकणाऱ्या व्यक्तीला हा गुंता सांग. तुझा प्रियकर किंवा त्याच्या कुटुंबियांना यासाठी पुढाकार घ्यायला सांग. या नात्याबद्दल तुझे पालक साशंक असतील. ते तुला काही प्रश्न विचारतील. या प्रश्नांची शांतपणे उत्तरं दे. त्यांच्या सगळ्या शंका दूर कर. याआधी तुझ्या प्रियकराला विश्वासात घे, त्याच्याशी स्पष्टपणे बोल. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घे.



# बेंगळुरूजवळ काय पाहाल?

भटकंती

बेंगळुरू हे सर्वात जास्त गर्दी असलेल्या शहरांपैकी एक आहे. येथील लोक सकाळपासून रात्री उशिरापर्यंत कामात व्यस्त असतात. पण या व्यस्ततेतून वेळ काढून काही लोक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कुटुंबासह किंवा मित्रमंडळींसह बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन करतात. तुम्ही बाहेर फिरायला जात असाल तर बेंगळुरू शहराला एकदा भेट द्याच. इथे भेट देण्यासाठी बेंगळुरू पॅलेस, लालबाग बोटॅनिकल गार्डन आणि उलसूर तलाव अशी प्रसिद्ध ठिकाणे आहेत.

बेंगळुरू पासून सुमारे १०० किलोमीटरपर्यंतच्या अंतरावर असलेल्या या सुंदर ठिकाणांना भेट देण्याचा प्लॅन करू शकता. येथील नैसर्गिक दृश्ये खूप मनमोहक आहेत. निसर्गाच्या सांनिध्यात राहून नेचर फोटोग्राफी करायला आवडत असेल, तर ही ठिकाणे योग्य आहेत.

**नंदी हिल्स**

नंदी हिल्स बेंगळुरूपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर आहे. इथे पोहोचण्यासाठी एक ते दोन तास लागू शकतात. चिकबल्लापूर रेल्वे स्टेशन हे नंदी हिल्सपासून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन आहे. इथून ते नऊ किलोमीटर अंतरावर आहे. इथे निसर्गाची सुंदर दृश्ये पाहायला मिळतात. सकाळी ६ ते ६.३० दरम्यान सूर्योदयाचे अद्भुत दृश्य पाहता येईल. या ठिकाणी देवनहळ्ळी किल्ला पाहू शकता आणि भोगानंदीश्वर मंदिराला भेट देऊ शकता.

**स्कंदगिरी**


स्कंदगिरी हे एक अतिशय प्रसिद्ध ठिकाण आहे. ते बेंगळुरूपासून ६२ किलोमीटर अंतरावर आहे. ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांनी या ठिकाणाला भेट द्यायलाच हवी. यासोबतच येथील सूर्योदय पाहण्याची संधी गमावू नका. तुम्हाला इथे ॲडव्हेंचरस ॲक्टिव्हिटी करण्याची संधीदेखील मिळू शकते. स्कंदगिरी हिल्सच्या माथ्यावर भगवान शंकराचे मंदिर आहे.

**चुंची धबधबा**

बेंगळुरू ते चुंची फॉल्स हे अंतर सुमारे ८० ते ९० किलोमीटर आहे. कर्नाटकातील कनकपुरा येथून मेकेदाटू आणि संगमला जाताना हा धबधबा दिसेल. येथील नैसर्गिक सौंदर्य मनमोहक आहे. हे एक परिपूर्ण असे पिकनिक स्पॉट आहे.


## हाऊ टू

### ऑन करा गेस्ट मोड



आपला स्मार्टफोन इतरांच्या हातात देण्याआधी छोटं सेटिंग करून बघा. अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये गेस्ट मोड असतो. तो ऑन केल्यानंतर दुसरं कोणी तुमचे फोटो किंवा इतर चॅट बघू शकत नाही. तुमचा फोन अगदी नव्यासारखा होतो. हा मोड ऑफ केल्यानंतर स्मार्टफोन पुन्हा आधीसारखा होतो. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जा. इथे युजर अकाउंट्स हा ऑप्शन्स दिसेल. या ऑप्शनमध्ये गेस्ट मोड दिसेल. हा मोड ॲक्टिवेट करून तुम्ही इतरांना स्मार्टफोन द्या.

## ॲप वर्ल्ड




### घरीच करा मेडिटेशन

दोस्तांनो, सध्याच्या काळात फिट राहणं खूप गरजेचं आहे. योगा, मेडिटेशनमुळे तुम्ही शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही फिट रहाता. काही ॲप्स डाउनलोड करून तुम्ही फिटनेसचे धडे घेऊ शकता. सिंपल हॅबिट: मेडिटेशनच्या मदतीने तुम्ही आरामात मेडिटेशन करू शकता. जगभरातली तज्ज्ञमंडळी तुम्हाला मार्गदर्शन करतील. 'काम' या ॲपमध्ये मेडिटेशनची विविध सत्र देण्यात आली आहे. त्यानुसार तुम्ही किती वेळ मेडिटेशन करायचं हे ठरवू शकता. 'ओक' हे ॲप मेडिटेशन आणि श्वसनाच्या व्यायामांच्या मार्गदर्शनाचं उत्कृष्ट माध्यम आहे.


## टेक गाईड

### अशी थांबवा प्री-इन्स्टॉल्ड ॲप्स




स्मार्टफोनमध्ये काही प्री- इन्स्टॉल्ड ॲप्स असतात. ती अनइन्स्टॉलही करता येत नाहीत. यातली बरीच ॲप्स फोनमधली स्पेस व्यापतात. अशा ॲप्सचं कार्य थांबवण्यासाठी काय करता येईल, याविषयी...अशी ॲप्स ऑफ करता येतात. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जनरल टॅबवर टॅप करा. मग 'ॲप्स अँड नोटिफिकेशन' सिलेक्ट करा. इथे 'अनइन्स्टॉल' आणि 'फोर्स स्टॉप' असे दोन पर्याय दिसतील. काही ॲप्ससाठी अनइन्स्टॉल पर्यायचा वापर करता येणार नाही. अशावेळी फोर्स स्टॉपचा पर्याय निवडता येईल. यानंतर ते ॲप फोनमध्ये दिसणार नाही.

## सोशल मिडिया





### इन्स्टा स्टोरी बनवा आकर्षक

सध्या इन्स्टाग्राम स्टोरीजची चलती आहे. तुमच्या स्टोरीज अधिक आकर्षक पद्धतीने सादर करून अधिकाधिक फॉलोअर्स मिळवता येतील. यासाठी तुमच्या स्टोरीला साजेसं संगीत जोडा. इन्स्टाग्रामचं म्युझिक फीचर यासाठी उपयोगी पडेल. इंस्टाग्राममध्ये स्टोरीसोबत एखादं कोडं जोडण्याची सोय आहे. त्याचा वापर करा. फॉलोअर्ससाठी प्रश्नोत्तराचं सत्र ठेवा. तुमच्या स्टोरीबाबत इतरांची मतं घेता येतील. यामुळे तुमची स्टोरी जास्तीत जास्त फॉलोअर्सपर्यंत पोहचू शकेल.

# लावा व्यायामाची सवय

फिटनेस फंडा



उद्यापासून व्यायाम सुरू करू असं म्हणणाऱ्यांचा उद्या कधीच येत नाही. तुम्हीही व्यायाम उद्यावर ढकलताय का? सकाळी उठून जीममध्ये जाणं तुमच्यासाठी खूप मोठं आव्हान आहे का? सकाळी मस्त ताणून द्यायची, आराम करायचा असं तुम्हाला वाटत असेल तर लवकर जागे व्हा. सकाळी उठून व्यायामाला सुरुवात करा. ही सवय लावून घेण्यासाठी काय करायचं याविषयी...

* सोशल मीडियावर काही वेळ घालवल्याशिवाय झोप येत नसेल तर तुम्हाला ही सवय बदलायला हवी. सोशल मीडियामुळे तुमचं वजन कमी होणार नाही. मात्र जीममध्ये घाम गाळल्यामुळे तुम्ही नक्कीच फिट व्हाल. सकाळी लवकर उठण्यासाठी रात्री लवकर झोपायला हवं. आठ तासांची शांत झोप घेतल्यानंतर सकाळी ताजंतवानं वाटतं. त्यामुळे दररोज लवकर उठण्याची सवय लावा.

* जीमला जाताना एखाद्या मित्र किंवा मैत्रिणीला सोबत घ्या. कोणीतरी सोबत असेल तर तुम्हालाही जीमला जाण्यात रस वाटेल. मस्त गप्पा मारत जीममध्ये जाण्याचा आनंद वेगळाच असतो.

* जवळची जीम शोधा. लांबवरच्या जीममध्ये जायचा खूप कंटाळा येतो. अशावेळी जवळच्या जीमचं सदस्यत्व घेतलं तर तुमचा वेळही वाचू शकेल.

* आपल्याला वजन कमी करायचं आहे असा दृढनिश्चय करा. एखाद्या दिवशी आपल्याला खूप कंटाळा येईल. पण हा कंटाळा बाजूला ठेऊन व्यायाम करायला जा. कंटाळ्यापेक्षाही व्यायाम जास्त महत्त्वाचा आहे.

* तुमचं वजन एका दिवसात वाढलेलं नाही. तसंच ते पटकन कमीही होणार नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी थोडा वेळ द्या. झटपट निकालांची अपेक्षा करू नका.

# स्टायलिश आणि कम्फर्टेबल जॅकेट्स

फॅशन पॅशन




लग्नापासून पार्टीपर्यंत आणि कोणत्याही प्रसंगी जॅकेट घातले जातात. लेदर फॅब्रिकपासून पॉलिएस्टर मटेरियलपर्यंत बनवलेले जॅकेट उबदारपणा देते. जॅकेट कोणत्याही वयोगटातील लोकांसाठी पहिली पसंती आहेत. यात रेग्युलर फिट प्रकार मिळतो. त्यामुळे शार्प लूक मिळतो.

प्रीमियम फॅब्रिक जॅकेट खरेदी करताना लोकांची अनेकदा फसवणूक होते. सॉलिड पॅटर्न असलेले हे जॅकेट लग्न समारंभापासून पार्टी आणि दैनंदिन पोशाखांपर्यंत सर्व ठिकाणी वापरले जातात. ही जॅकेट्स चांगला लूक देतात. विविध रंग आणि आकारांनुसार घालू शकता. प्रवास करताना आणि जिम करताना ती आरामदायी असतात. जॅकेट सॉफ्ट फिनिशसह एलिगंट आणि समृद्ध लूक देतात. सॉलिड पॅटर्न असलेले जॅकेट्स तुम्हाला पार्टी, लग्न, प्रसंगी आणि कार्यक्रममध्ये प्रभावी बनवतात. ते फक्त एकाच वॉशमध्ये चमकदार स्वच्छ होतात.

मेन व्हर्सिटी स्टायलिश लेटरमन लाँग स्लीव्हज विंटर जॅकेट हे जॅकेट लांब बाहीमध्ये येते. ते तुम्हाला नियमित शैलीत डॅशिंग लूक देते. त्यात झिप क्लोजर प्रकार आहे. तो तुम्हाला चांगली पकड देतो. स्टाईल वाढवण्यासाठी हे जॅकेट अनेक रंगांच्या पर्यायांमध्ये येतात. पार्टी ते ऑफिस आणि रेग्युलर या जॅकेटना पर्याय नाही. यात साइड पॉकेट्स असतात. त्यात तुम्ही आवश्यक गोष्टी ठेवू शकता. तुम्हाला डॅशिंग बनवण्यासाठी, त्याच्या दोन्ही साइड स्लीव्हजना वेगवेगळे रंग देण्यात आले आहेत.

# कला शाखेतील युवक-युवती होऊ शकतात पायलट

करियरवाटा



विमान चालवण्याचे, आकाशात उंच भरारी घेण्याचे स्वप्न अनेकजण बघतात, मात्र आतापर्यंत या स्वप्नासाठी एक मोठी अट होती. ती म्हणजे या क्षेत्रात जाण्यासाठी बारावी मध्ये विज्ञान शाखा असावी लागते. त्यामुळे अनेक कला आणि वाणिज्य शाखेतील हुशार विद्यार्थी या क्षेत्रात जाण्यापासून वंचित राहायचे. मात्र आता ही परिस्थिती बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवाई वाहतुकीचे नियमन करणाऱ्या भारताच्या सर्वोच्च संस्थेने (डीजीसीए – डिरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन) एक महत्त्वपूर्ण शिफारस केली आहे. त्यामुळे आता कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनाही कमर्शिल पायलट परवान्यासाठी प्रशिक्षण घेता येणार आहे.

'डीजीसीए' ने हा प्रस्ताव नागरी उड्डाण मंत्रालयाकडे पाठवला आहे. मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव कायदा मंत्रालयाकडे जाईल आणि त्यानंतर अधिकृतपणे लागू होण्याची शक्यता आहे. या नव्या नियमाच्या अंमलबजावणीने १२ वी उत्तीर्ण, वैद्यकीयदृष्ट्या सक्षम आणि इतर आवश्यक परीक्षा उत्तीर्ण केलेले सर्व शाखांचे विद्यार्थी पायलट प्रशिक्षणासाठी पात्र ठरतील.

**३० वर्षांनंतर मोठा बदल**

१९९० च्या दशकापासून 'सीपीएल' प्रशिक्षण फक्त विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित होते. यामुळे कला आणि वाणिज्य शाखांच्या अनेक हुशार विद्यार्थ्यांना पायलट होण्याची संधी मिळत नव्हती. गेल्या काही वर्षांमध्ये कला व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना 'ओपन स्कूल'मध्ये जाऊन भौतिकशास्त्र आणि गणिताची परीक्षा पुन्हा द्यावी लागत होती.

**वाढती मागणी आणि तयारी**

'डीजीसीए'ने या नव्या नियमामुळे पायलट होण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे या वाढलेल्या मागणीला तोंड देण्यासाठी आणि प्रशिक्षणाचा दर्जा टिकवण्यासाठी भारतातील 'फ्लायिंग स्कूल्स'ना अधिक सक्षम करण्याच्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. 'डीजीसीए'चे अध्यक्ष फैज अहमद किदवई यांनी 'फ्लायिंग स्कूल्स'ना वेबसाइटवर प्रशिक्षणाचा कालावधी, उपलब्ध विमानांची संख्या, प्रशिक्षकांची उपलब्धता आणि सिम्युलेटरची स्थिती यासारखी माहिती पारदर्शकपणे प्रदर्शित करण्याचे आदेश दिले आहेत.

**पायलट बनण्याचे स्वप्न आता सर्वांसाठी!**

हा निर्णय भारतातील विमानचालन क्षेत्रात समावेशकता वाढवण्याचा एक मोठा टप्पा ठरणार आहे. यामुळे देशातील विमानचालन क्षेत्रालाही मोठा फायदा होण्याची शक्यता आहे, कारण या नव्या धोरणामुळे अधिक प्रमाणात प्रशिक्षित, कुशल आणि विविध पार्श्वभूमीचे पायलट तयार होतील.

# पाण्यापासून मोबाईलचे संरक्षण करायचेय ?

भटकंती



पावसाळा सुरू झाला आहे. देशभरात अनेकठिकाणी जोरदार पाऊस पडत आहे. भारतीय हवामान खात्याने २० हून अधिक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यात उत्तराखंड, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्य भारताचा समावेश आहे. अशा वेळी ऑफिस, कॉलेज किंवा बाहेर जाताना फोनचे पाण्यापासून संरक्षण करणे गरजेचे आहे. पावसात फोन खराब होऊ नये, यासाठी पाच सोप्या टिप्स जाणून घ्या.

१. पावसाळ्यात वॉटरप्रूफ फोन केस घेणे महत्त्वाचे आहे. या फोन केसला पाणी आणि ओलाव्यापासून वाचवण्यासाठी बनवलेले असते. बाजारात अनेक प्रकारच्या वॉटरप्रूफ केस उपलब्ध आहेत. तुमच्या फोन मॉडेलला सुट होईल अशी केस निवडा. यामुळे पाण्यामुळे होणारे नुकसान टाळता येईल.

२. वॉटरप्रूफ केस वापरणे शक्य नसेल तर फोन सीलबंद वॉटरप्रूफ पाऊचमध्ये ठेवा. पाऊच पूर्णपणे बंद होत आहे आणि पाणी आत जाणार नाही, याची खात्री करा. पाऊचमध्ये सिलिका जेलचे छोटे पॅकेट ठेवा. ते ओलावा शोषून घेईल. पाऊच स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे.

३. पावसात फोनचे नुकसान टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे पावसात फोन वापरू नका. फोन खिशात किंवा बॅगेत ठेवा. कॉल किंवा मेसेज पाठवायचा असेल, तर थांबून कोरड्या जागेची निवड करा. पाण्याच्या संपर्कात फोन येणे टाळा.

४. चुकून फोन ओला झाला, तर घाबरू नका. मऊ कापडाने किंवा टिश्यू पेपरने फोन पुसा. पाणी शोषण्यासाठी फोन तांदळाने भरलेल्या भांड्यात २४ तास ठेवा. तांदूळ ओलावा शोषून घेतात. यामुळे फोनचे नुकसान टाळता येईल. फोन बंद करून बॅटरी काढता येत असेल, तर काढा.

५. फोन खरेदी करताना त्याची आयपी रेटिंग तपासा. आयपी ६७ किंवा आयपी ६८ रेटिंग असलेले फोन पाणी आणि धुळीपासून सुरक्षित असतात. असे फोन पावसात किंवा पाण्याच्या संपर्कात आले, तरी खराब होण्याची शक्यता कमी असते. नवीन फोन घेताना हे रेटिंग नक्की तपासा.

# राज्यस्तरीय जाहिरात एजन्सी फेडरेशनच्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड

## अध्यक्षपदी नाशिकचे रवी पवार, राज्य कार्यकारिणी मंडळावर गॅलेक्सी ॲडव्हर्टायझिंगचे राजेंद्र म्याना यांची निवड

नगर – महाराष्ट्रातील ॲडव्हर्टायझिंग एजन्सीजची राज्यस्तरीय शिखर संस्था असलेल्या फेम (फेडरेशन ऑफ ॲडव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग एंटरप्रेनियर्स) ची जनरल बॉडी मिटिंग १४ जूनला पुणे येथे झाली.

यावेळी पुणे, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सांगली, सातारा, कोकण, जळगाव, अहिल्यानगर, सोलापूर आदी जिल्ह्यांतील जाहिरात एजन्सीजचे प्रतिनिधी, तसेच जिल्हा संघटनेचे सदस्य उपस्थित होते.



महाराष्ट्रातील ॲडव्हर्टायझिंग एजन्सीजची राज्यस्तरीय शिखर संस्था असलेल्या फेम (फेडरेशन ऑफ ॲडव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग एंटरप्रेनियर्स) ची जनरल बॉडीच्या मिटिंगमध्ये उपस्थित असलेले विविध जाहिरात एजन्सीज्चे संचालक.

यावेळी 'फेम'च्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. फेमचे संस्थापक अध्यक्ष अमरदीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व माजी अध्यक्ष मोतीराम पिंगळे व मावळते अध्यक्ष महेश कराडकर, उपाध्यक्ष प्रफुल्ल मुथा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सन २०२५–२७ या कालावधीसाठी अध्यक्षपदी रवी पवार (नाशिक), उपाध्यक्ष प्रकाशभाई शहा (पुणे), सचिव रामदेव व्यास (छत्रपती संभाजीनगर), सहसचिव अजिंक्य उजळंबकर (छत्रपती संभाजीनगर), खजानीस कौस्तुभ नाबर, (कोल्हापूर) तसेच पुढील २०२७–२९ या कालावधीसाठी अध्यक्ष (इलेक्ट) म्हणून संदीप झवेरी (सोलापूर) यांची यावेळी बिनविरोध निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून संजय साताळकर (पुणे), सुनील बासरानी (कोल्हापूर), दीपक जगताप (नाशिक), संतोष उदगिरी (सावा), राहुल देशपांडे (सातारा), नरेंद्र चौधरी (जळगाव), अरुण मलिक (छत्रपती संभाजीनगर), राजेंद्र म्याना (अहिल्यानगर), सुनील बुधवानी (नागपूर), राजेश वाळवेकर (बेळगाव), परेश पेडणेकर (कोकण) यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या सुरवातीला मावळते अध्यक्ष महेश कराडकर यांनी त्यांचा कार्य अहवाल मांडला. कौस्तुभ नाबर यांनी मागील सभेचे इतिवृत्त व आर्थिक अहवाल सादर केला त्यास मंजुरी देण्यात आली.

या मीटिंगसाठी अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट ॲडव्हर्टायझिंगचे अध्यक्ष गुलशन अरोरा, सचिव सुरेंद्र मुथा, नितीन देशमुख, जयंत देशपांडे, राजेंद्र म्याना, प्रसाद मांढरे यांच्यासह फेमचे माजी उपाध्यक्ष प्रफुल्ल मुथा उपस्थित होते.

नूतन अध्यक्ष रवी पवार यांनी जाहिरात एजन्सीच्या उन्नतीसाठी येणाऱ्या काळात विविध सेमिनार तसेच प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच अद्याप ज्या जिल्ह्यांमध्ये जाहिरात एजन्सीजच्या जिल्हा संघटना कार्यरत नाहीत तेथे जिल्हा संघटना सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे पवार म्हणाले.

जाहिरात एजन्सी समोरील विविध समस्या व आव्हानांची यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. संदीप झवेरी यांनी सूत्रसंचालन केले. सचिव रामदेव व्यास यांनी आभार मानले. यावेळी राज्यातील सर्व एजन्सीजचे संचालक उपस्थित होते.

# लाड पागे समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करा

### ॲडव्होकेट गोरक्ष लोखंडे यांचे निर्देश



महापालिकेच्या सभागृहात आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांशी बोलताना राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे आदी.

नगर – सफाई कामगारांच्या हक्कासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या लाड पागे समितीच्या शिफारशींची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. याअंतर्गत प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढून कामगारांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे यांनी दिले.

महापालिकेच्या सभागृहात आयोजित बैठकीत ॲड.लोखंडे बोलत होते. बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त डॉ.संतोष टेंगळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन धस, सहायक आयुक्त सपना वसवा, अशोक साबळे, निखिल फराटे, मेहेर लहारे, जल अभियंता परिमल निकम, शहर अभियंता मनोज पारखे, पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता गणेश गाडलकर, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, कामगार अधिकारी धनंजय शित्रे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, श्याम गोरलकर, शहाजहान तडवी आदी उपस्थित होते.

श्री.लोखंडे म्हणाले, कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व सवलती द्याव्यात, कामगारांना किमान वेतन मिळेल याची दक्षता घ्यावी. सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, मास्क आदी सुरक्षा साधने तात्काळ पुरविण्यात यावेत. कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी. रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा. शहरातील झोपडपट्टी भागात आवश्यक त्या सर्व सोयी–सुविधा पुरविण्याच्या सूचनाही ॲड.लोखंडे यांनी यावेळी दिल्या.

### २ वारसांना नियुक्तीपत्राचे प्रदान

लाड पागे समितीच्या शिफारशीअंतर्गत दोन कर्मचाऱ्यांच्या वारसांना ॲड.गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचे प्रदान करण्यात आले. विनोद नेटके व सौरभ भोसले या वारसांना नियुक्तीपत्र प्रदान करत चांगले काम करा, असेही ॲड.लोखंडे म्हणाले.

### रमाई आवास योजना प्रकल्प व विकासकामांची पाहणी

रमाई आवास योजनेंतर्गत शहरातील प्रकल्पांना ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी भेट देऊन पहाणी केली. तसेच यावेळी लाभार्थ्यांशी संवादही साधला. या प्रकल्पांना आवश्यक त्या सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. तसेच रामवाडी, सिद्धार्थनगर भागाला प्रत्यक्ष भेट देऊन त्या ठिकाणच्या विविध विकास कामांची पहाणीही त्यांनी यावेळी केली.



### बागडपट्टी येथे विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक

बागडपट्टी येथील रहिवासी सुनील, सचिन, सागर व समर्थ गोंधळे व समस्त परिवाराकडून स्वखर्चाने बैलगाडी सजवून बागडपट्टी ते नवीपेठ येथील बाई ईचरचबाई फिरोदिया प्रशालेपर्यंत विद्यार्थ्यांची मिरवणूक काढली. तसेच विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. शाळेचे शिक्षक व मुख्याध्यापिका सिसोदिया मॅडम यांनी गोंधळे परिवाराच्या उपक्रमाचे कौतुक केले.

# उद्योजकांचा एकत्रित दौरा नवीन संकल्पनांना चालना देतो

### आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; आमी संघटना, एमआयडीसीचे उद्योजक व्हियतनाम दौऱ्यावर

नगर – आमी संघटना ही नेहमीच सामाजीक, सांकृतिक तसेच विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करत असते हे सर्व करत असताना आपल्या संघटनेतील पदाधिकारी व सदस्य यांच्यासाठी औद्यागिक क्षेत्राशी निगडीत विविध सेमिनार, फेअरवेल, एक्झिबिशन गेटटुगेदर कार्यक्रम राबविते त्यांचाच एक भाग म्हणून आमी संघटना दरवर्षी औद्योगिक सहलीचे आयोजन करते. आज आमीचे पदाधिकारी व सद्स्य व्हियतनाम येथे होणाऱ्या VIMF – २०२५ या महत्वाच्या फेअरवेल साठी रवाना होत आहे. याचा फायदा निश्चितच नव्याने होणाऱ्या औद्योगिक वसाहतीसाठी होईल. व्हिएतनामचा आमीचा औद्योगिक दौरा अहिल्यानगरसाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी व्हियतनाम दौऱ्यावर चालेलेले ५४ पदाधिकाऱ्यांच्या आयोजित शुभेच्छा कार्यक्रम प्रसंगी केले.




व्हिएतनाम दौऱ्यावर निघालेल्या उद्योजकांना शुभेच्छा देताना आ.संग्राम जगताप आदी. (छाया – अमित मन्यार)

कार्यक्रमास राजेंद्र चोपडा, आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, राजेंद्र कटारिया, संजय बंदिष्टी, दिलीप अकोलकर, राजीव गुजर, सागर निंबाळकर, महेश इंदानी, सचिन पाठक, सुमित लोढा, प्रफुल्ल पारेख, मिलिंद कुलकर्णी, सागरराजे निंबाळकर उपस्थित होते

पुढे बोलताना आ. जगताप म्हणाले की एकत्रित येऊन उद्योजक दौऱ्यावर जातात त्यावेळस आपल्याला औद्यागिक क्षेत्रात येणाऱ्या तांत्रिक अडचणीसह विविध समस्या यावर चौफेर चर्चा करता येते. जगाच्या पाठीवर होणाऱ्याऔद्यागिक बदलांचा अभ्यास अशा दौऱ्यातून त्यांना जाणून घेता येतो. व्हिएतनाम च्या VIMF २०२५ या फेअरवेलसाठी आमीच्या पदाधिकारी व सदस्यांचे व परिवाराचे अभिनंदन करून त्यांचा हा औद्योगिक दौरा यशस्वीरित्या त्यांनी पूर्ण करावा या साठी ईश्वरचरणी प्रार्थना करतो व त्यांना शुभेच्छा देतो.

आमीचे खजिनदार सुमित लोढा यांनी सांगितले की व्हियतनाम येथे आमीचे ५४ उद्योजक VIMF या औद्योगिक फेअरवेल साठी चाललो आहोत. व्हिएतनाम हा देश छोटा असला तरी तोही आज औद्योगिक क्षेत्रात आघाडी घेत आहे. या ठिकाणी शिट मेटल, मशीन कंपाऊनंन्ट, प्रेस मेटल व विविध प्रोसेसिंग मशनरी यांचा अभ्यास करुन भारत व व्हियतनाम ज्या माध्यमातून नवीन संकल्पना राबविता येतील का या विषयावर तेथील उद्योजकाशी चर्चा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सुत्रसंचालन राजेंद्र कटारिया यांनी केले तर दौऱ्याचे नियोजन प्रफुल्ल पारेख व राजीव गुजर यांनी केले. आभार प्रदर्शन मिलिंद कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन एस् के पेट्रोलियम व चोपडा परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

# 'कर्मयोगी प्रतिष्ठान'च्यावतीने विद्यार्थांचा सन्मान करून व वृक्षारोपण

नगर – नुकत्याच पार पडलेल्या विधी विभागाच्या परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन यश संपादन केल्याबद्दल कर्मयोगी प्रतिष्ठानतर्फे सदर विद्यार्थी – विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कर्मयोगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष शफि जहागिरदार यांनी हजरत मिरावली पहाड येथे स्नेह भोजन आयोजित केले होते. शिक्षण आणि कामासोबत सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी या हेतूने सदर विद्यार्थ्यांच्या हस्ते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले.



विधी विभागाच्या परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन यश संपादन केल्याबद्दल कर्मयोगी प्रतिष्ठानतर्फे सदर विद्यार्थी – विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला.

ॲड. सानिया नफिस चुडीवाला (एल एल बी), ॲड. अरीबा फ़ारुक शेख (एल एल बी), ॲड. नोमान अज़िम जहागिरदार (एल एल बी) त्याचबरोबर १२ वी वाणिज्य विभागात, अहमदनगर महाविद्यालयात विशेष प्राविण्यासह प्रथम आलेली कु. निदा इकबाल चुडीवाला हिचा देखील सत्कार करण्यात आला. व झाडे भेट देण्यात आली.

याप्रसंगी शरद पवार होमिओपॅथिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रिज़वान अहमद, मिनर्व्हा इन्फ्राचे इंजि. अनिस शेख, नगरसेवक असिफ सुलतान, जेष्ठ विधीज्ञ फ़ारुक बिलाल, समाजसेवक नफ़िस चुडीवाला, जी.ए. एजन्सी चे अज़िम जहागिरदार, डॉ.रेश्मा रिज़वान, ॲड. साजिया सय्यद, जोधपूर येथून आलेले हैदर अली उपस्थित होते.

कर्मयोगी प्रतिष्ठानचे मार्गदर्शन सदस्य त्वचारोग तज्ज्ञ डॉ. एम. के शेख यांनी सर्व यशवंताना पारितोषिक देऊन प्रोत्साहन दिले.

यावेळी विद्यार्थ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कर्मयोगी प्रतिष्ठानचे माजी जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफ़िक मुन्शी, मोहसीन बारुदवाले, डॉ.इमरान शेख, समिरखान यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# नगरमध्ये १९ जूनला मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १९ जूनला मोफत हृदयरोग तपासणी शिबीर होणार आहे. नगर शहरात तारकपूर येथील सिटी केअर हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. यात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. नगरमधील शिबिरासाठी ७३८५१९५९६२, ९२०९६३२५०२ या मोबाईल क्रमांकावर नाव नोंदणी करावी.


## भिंगार अर्बन को. ऑप. बँक लि., भिंगार, अहमदनगर.

### सोने तारण दागिन्यांच्या लिलावासंबंधी

### -: जाहीर नोटीस :-

खालील नमूद केलेल्या सोनेतारण कर्जदारांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आपण बँकेकडे सोने दागिणे तारण ठेवून कर्जाऊ रक्कम घेतलेली आहे. सदर कर्जाची येणेबाकी व्याजासह सर्व रक्कम करारनाम्याप्रमाणे बँकेकडे भरलेली नाही.

| खाते क्र. | खातेदाराचे नांव | पत्ता | येणेबाकी |
|---|---|---|---|
| **पाईपलाईन रोड शाखा** | | | |
| ३४८५२ | आरगळे राम सुदाम | बंगला क्र. ९५, जोशी बंगला, विठ्ठल रुक्मिणी मंदीराजवळ, आनंदनगर, गुलमोहर रोड ,अ.नगर | २४,२३३/– |
| **माळीवाडा शाखा** | | | |
| ८५६५६ | गायकवाड सुनिल नारायण | २७७ लिंक रोड, केडगांव, ता.जि.अ.नगर | १७,८९९/– |
| **झोपडी कॅन्टीन शाखा** | | | |
| २८७०२ | श्री. डहाणे योगेश बाळू | पिंपळगाव लांडगा, ता. नगर | २६,३२६/– |
| २८७३९ | सौ. शेख नसिमबानो शाहीद | ७०८०, झेंडीगेट रोड, इदगाह मैदान, अ.नगर | २३,९२३/– |
| **बोल्हेगांव शाखा** | | | |
| २५०८७ | चौधरी कल्पना उत्तम | द्वारा रवी पठारे, स.नं. ७६, भारत बेकरी जवळ, बोल्हेगांव, ता.जि.अ.नगर | १९,८१०/– |

आपण बँकेकडून घेतलेले सोनेतारण कर्जाचे येणे रकमेची फेड करारनाम्याप्रमाणे मुदतीत केली नाही. बँकेची सर्व येणे रक्कम भरणा करुन तुमचे दागिणे सोडवून न्यावेत अथवा नूतनीकरण करुन घ्यावे. याबाबत आपणांस दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर पोहोच पावतीने नोटीस पाठविलेली होती. तरी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि. २५/०६/२०२५ सकाळी ११.३० पर्यंत संपूर्ण रकमेची परतफेड न केल्यास बँकेच्या सोनेतारण कर्ज नियम क्र. ९ अन्वये व करारनाम्या अन्वये बुधवार, दिनांक २५/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता आपण तारण ठेवलेले सोन्याचे दागिणे बँकेच्या प्रधान कार्यालयातील सभागृहात जाहीर लिलावाने विकण्यात येतील. सदर विक्रित खर्चासह सर्व रक्कम वसूल न झाल्यास त्याच्या सर्व परिणामांची जबाबदारी तुमच्यावर राहील.

आपण आपल्या सोनेतारण कर्जाची येणे बाकी होणारे व्याज व इतर खर्चासह होणारी रक्कम दिनांक २५/०६/२०२५ सकाळी ११.३० पर्यंत भरुन आपले तारण सोने दागिने सोडवून घ्यावे.

दि. १७/०६/२०२५.

**श्री. शशीकांत उमाकांत महाजन** व्यवस्थापक | **श्री. किसनराव सखाराम चौधरी** व्हा.चेअरमन | **श्री. अनिलराव मधुकरराव झोडगे** चेअरमन


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अनेक वर्षापासून सिद्धार्थनगर नागरी सुविधांपासून वंचित

नगर – सिद्धार्थनगर परिसरात अनेक वर्षापासून हा परिसर नागरी सुविधा पासून वंचित असल्याने नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देताना सिद्धार्थनगर परिसरातील रहिवासी अंकुश मोहिते, दिव्या पवार, चंदा वैराळ, ज्योती काळे, गायत्री ससाने, माया वैरागर, अनिता कांबळे, छबु बुलाखे, पायल भालेराव, ज्योती शेंडगे, मंगल भागवत, इंदुबाई खुडे, कल्पना काते, संगीता नन्नवरे, काजल रोकडे, संजू डाके, विशाल पाटोळे, विशाल भालेराव, आकाश पवार, प्रभाकर लोखंडे, राम भास्कर आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सिद्धार्थनगर परिसरात अनेक वर्षापासून रहिवासी असून नागरी सुविधा पासून वंचित आहे. आमच्या भागात गटार व रस्त्याची दुरावस्था झालेली आहे तसेच घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून पावसाळ्याच्या दिवसात मलेरिया, डेंगू अनेक आजारे निर्माण होण्याची शक्यता असल्याने लवकरात लवकर सिद्धार्थनगर भागातील नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले आहे.



सिद्धार्थनगर येथील नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांना रहिवाश्यांसमवेत निवेदन देताना सिद्धार्थनगर परिसरातील नागरिक.

# श्रमिकनगरच्या श्री मार्कंडेय शाळेत औक्षणाने विद्यार्थ्यांचे स्वागत

### रिमझिम पावसात रंगला विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा

नगर – श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक आणि बालक मंदिर विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पारंपरिक औक्षणाने स्वागत करण्यात आले. रिमझिम पावसाच्या सरींच्या साक्षीने १६ जून रोजी सकाळी रंगलेल्या या स्वागत सोहळ्यात विद्यार्थ्यांमध्ये नव्या वर्षाची उमेद आणि उत्साह दिसून आला.

शाळेच्या प्रवेशद्वारावर फुग्यांनी सजलेली आकर्षक स्वागत कमान उभारण्यात आली होती. रंगीबेरंगी रांगोळीने शाळेचा परिसर सजवण्यात आला होता. प्रत्येक वर्गात फुगे लावून आकर्षक सजावट करण्यात आली होती. नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे महिला शिक्षकांनी औक्षण करून स्वागत केले, तर सर्व विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प आणि चॉकलेट वाटप करण्यात आले.



श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक आणि बालक मंदिर विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पारंपरिक औक्षणाने स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात पद्मशाली विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम आणि नगरसेवक मनोज दुलम यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, शंकर येमूल, श्रमिक जनता हाऊसिंग सोसायटीचे अध्यक्ष विलास सग्गम, शाळा व्यवस्थापन समितीचे रमा श्रीनिवास भैरी, विद्या एक्कलदेवी, प्रियंका पासकंटी, विजया रायपेल्ली, मोनाली खंडागळे, निलिमा दुर्गम, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे, माध्यमिकचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे, शिक्षक प्रतिनिधी वैशाली वरुडे, सुचेता भावसार आदींसह शालेय शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व पालक उपस्थित होते.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शिक्षकांनी शाळा सुरू होण्याआधीच श्रमिकनगर परिसरात गृहभेट उपक्रम राबविल्यामुळे पहिल्याच दिवशी शाळेत विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती नोंदवण्यात आली. नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थीही आनंदाने शाळेत दाखल झाले. शाळेत बनविलेल्या सेल्फी पॉईंटवर विद्यार्थ्यांनी पालकांसह फोटो घेतले. विद्यार्थ्यांच्या आनंदी चेहऱ्यांनी शाळा परिसर फुलला होता.

संस्थेचे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांनी शाळेच्या पहिल्या दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

